# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक


१ ● संपादकीय

३ ● जागतिक मंदी आणि भारतीय अर्थव्यवस्था

८ ● अमेरिकेतील बेरोजगारी व भारतातील रोजगारी

१३ ● बांगलादेश : कापड उद्योग व अर्थव्यवस्था अडचणीत?

१७ ● दक्षिण आशियात इस्लामचा वाढता प्रभाव

२२ ● चीनमधील प्रसारमाध्यमे

२६ ● नवशतकातील निरक्षर भारत

२८ ● विनोदोपचार !

३० ● शांततेच्या पाऊलखुणा (औद्योगिक संस्थांचे प्रयत्न)

३३ ● जगाच्या पाठीवर....

३५ ● कालप्रवाहात......



खंड २ : अंक ११ फेब्रुवारी २००४

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**
व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
ई-मेल : ispe@vsnl.com
फॅक्स : २५६५७६९७


---


**अर्थबोधपत्रिका**
**खंड २ (अंक ११) फेब्रुवारी २००४**
**संपादक** - रमेश पानसे,
**संपादन साहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## ‘अर्थबोधपत्रिके’तील माहिती कशी?

## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे ‘अर्थबोधपत्रिका’ हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने’** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# संपादकीय

जागतिकीकरणाच्या आणि खुल्या अर्थव्यवस्थांच्या धोरणामुळे, जगात काही अगदी मूलभूत स्वरूपाच्याच उलथापालथी होत आहेत. घडून येणारे परिणाम केवळ आर्थिकच आहेत, असे नाही; ते राजकीय आणि सामाजिक स्वरूपाचेही आहेत. या सर्वच क्षेत्रांमध्ये घडणाऱ्या घटनांना वेग मात्र आला आहे. एवढेच नव्हे तर, पश्चिमेकडून अतिपूर्वेकडच्या अशा जवळजवळ सर्वच राष्ट्रांना, वेगाने घडत असलेल्या बदलांना तोंड द्यावे लागत आहे; काहींना त्याची झळ बसते आहे.

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे देशादेशांच्या संदर्भात फायद्या-तोट्यांची गणिते कशी बदलत आहेत, याचा वेध घेणारे दोन लेख या अंकात, एकत्रितरीत्या देण्यात आले आहेत. एक लेख आहे तो भारत-चीन-अमेरिका यांच्या संदर्भातला, तर दुसरा आहे तो प्रामुख्याने बांग्लादेशाच्या संदर्भातला. सुरूवातीलाच दिलेला जरा सैद्धांतिक स्वरूपाचा अलीकडच्या, जागतिक मंदीच्या परिस्थितीचे विश्लेषण करणारा लेख, हा या दोन लेखांची पार्श्वभूमी स्पष्ट करणारा असा आहे, असे वाचकांच्या लक्षात येईल. औद्योगिक 'शांततेच्या पाऊलखुणा'ही अशाच बदलांची परिणती आहे.

'इस्लामचा वाढता प्रभाव' ही आजच्या नि भावीकालाच्या दृष्टीने, अगदी जागतिक स्तरावरची महत्त्वाची बाब मानली जाते, तिचे इंडोनेशिया व मलेशियामधील रूप, एका लेखात विस्ताराने देण्यात आले आहे. 'जगाच्या पाठीवर' घडणाऱ्या धार्मिक घटनाही वाचकांचे लक्ष वेधून घेतील.

चीनबाबत, 'अर्थबोधपत्रिके'त नेहमीच काही ना काही पण महत्त्वाचे असे लेखन प्रसिद्ध होत असते. हा अंकही त्याला अपवाद नाही. माणसाच्या दैनंदिन जीवनात विनोदाचे स्थान फार वरचे आहे; हे आता विविध अभ्यासांमधून सिद्ध होत आहे. रूग्ण व डॉक्टर यांच्या संबंधातील 'विनोदोपचार' हा वेगळा उपायही वाचकांना नक्कीच भावेल.

भारतातील शिक्षणाच्या संदर्भातील, नव्याने उपलब्ध झालेली काही आकडेवारी आवर्जून या अंकात देण्यात आलेली आहे. वाचकांना ती अंतर्मुख करील असा विश्वास वाटतो.

■■

# वाचकांचा प्रतिसाद

आमच्या बँकेत आपली अर्थबोधपत्रिका वाचण्यास मिळाली. हे मासिक आपल्या घरी देखील असावे व परिवारातील सदस्यांना त्यातील ज्ञानाचा लाभ व्हावा, असे वाटल्याने वर्गणी पाठवीत आहे. हिरालाल मेश्राम, ब्रह्मपुरी

जानेवारी २००४ चा अर्थबोधपत्रिकेचा अंक मिळाला. एक चांगले व्यसन आपण लावत आहात. कारण अंक हातात घेताक्षणीच वाचावा लागतो. अंकाची गुणवत्ता अशीच राहावी ही अपेक्षा. विनायक महाजन, कुडावळे,

## जीवन हेच शिक्षण

शिक्षक आणि मुले दोघेही एकमेकांच्या आचरणापासून शिकत असतात. दोघेही विद्यार्थीच आहेत. जे दिले जात नाही ते शिक्षण. ज्याचा हिशोब ठेवला जाऊ शकतो ते शिक्षण नाही. शिक्षणाची मोजदाद नाही. जीवनच शिक्षण आहे. कॅलरींचा खरा हिशोब कागदावर नव्हे, तर शरीरावर दिसून येतो. जे अनुभवले, खाल्ले, पचले आणि रक्तात मुरले तेच शिक्षण. *(शिक्षण विचार - विनोबा)*

## संस्थेची इतर प्रकाशने

(१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) गव्हर्नन्स, सुपरव्हिजन अँड मार्केट डिसिप्लिन : लेसन्स फ्रॉम एन्रॉन (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयंत वर्मा (किंमत शंभर रुपये)

आर्थिक

# जागतिक मंदी आणि भारतीय अर्थव्यवस्था

विसाव्या शतकाच्या अखेरीच्या कालखंडात आणि १९९० च्या दशकात झालेली राजकीय आणि आर्थिक स्थित्यंतरे तशी लक्षवेधीच आहेत. सोव्हिएट रशियाचे विघटन, इतर समाजवादी राष्ट्रांचे भांडवलशाही राष्ट्रांमध्ये झालेले परिवर्तन, आणि असे परिवर्तन होत असताना त्यांचे जागतिक व्यापाराशी जोडले जाणारे संबंध, तसेच संक्रमणकाळात निर्माण झालेल्या प्रचंड अडचणी; जपानच्या अर्थव्यवस्थेची दशकभर राहिलेली कुंठितावस्था, पूर्व आशियातील राष्ट्रांची आर्थिक भरारी आणि लगेचच त्यांचे झालेले आर्थिक पतन, मेक्सिको, ब्राझील आणि अर्जेन्टिना यांच्यापुढे उभे राहिलेले कर्जांचे प्रचंड पर्वत इत्यादी घटना वेगाने घडत गेल्या. परंतु हे सगळेच प्रश्न बरेचसे 'प्रादेशिक' स्वरूपाचे होते. तसेच या प्रश्नांमधून निर्माण झालेली मंदीही त्या त्या राष्ट्रांपुरती व फार फार तर त्या त्या प्रादेशिक क्षेत्रांपुरतीच सीमित राहिली. मात्र, सध्याच्या मंदीचे स्वरूप 'प्रादेशिक' न राहता 'जागतिक' बनले आहे. सगळ्याच औद्योगिक राष्ट्रांमध्ये ती पसरली आहे. एकूण जागतिक उत्पादनात नेमक्या याच औद्योगिक राष्ट्रांचा वाटा मोठा आहे. इतकेच नव्हे तर, एकूण जागतिक व्यापारातही याच राष्ट्रांचे प्रमाण मोठे आहे.

जागतिक बँकेच्या २००३ च्या अंदाजानुसार, एकूण जागतिक व्यापार वाढला असला, तरी इ.स. २००० साली या वाढीचा ३.८ टक्के असणारा दर, २००१ मध्ये १.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला; २२ उद्योगप्रधान राष्ट्रांचे औद्योगिक उत्पादन २०००-२००१ च्या काळात ३.५६ टक्क्यांनी कमी झाले. याच काळात, जागतिक निर्यात ३.५६ टक्क्यांनी तर जागतिक आयात ३.४६ टक्क्यांनी कमी झाली. अमेरिका, जर्मनी, कॅनडा, जपान, इग्लंड, कोरिया अशा अनेक देशांचे एकूण देशांतर्गत उत्पादन (GDP) कमी झाले. म्हणूनच या मंदीचे स्वरूप 'प्रादेशिक' न मानता 'जागतिक' मानावे लागते.

## माहिती तंत्रज्ञान क्रांती

जागतिकीकरणाचा सध्याचा टप्पा आणि १९९० च्या दशकातील मंदी यांचा संबंध माहिती -तंत्रज्ञान क्षेत्रातल्या क्रांतीशी जोडला जातो. या नव्या तंत्रज्ञानामुळे माहितीचे संकलन आणि प्रक्षेपण करण्याची नुसती क्षमताच वाढली असे नाही, तर

त्यांचा वेगही प्रचंड वाढला आहे. यामुळे, साहजिकच, आर्थिक व्यवहाराचा खर्चही खूप कमी झाला आहे. माहितीचा शोध, तिच्याशी संपर्क, तिचे प्रक्षेपण आणि तिच्यावरील प्रक्रिया - यांच्याशी संबंधित असलेला हा खर्च असतो. माहिती - तंत्रज्ञान क्षेत्रातल्या क्रांतीचा एक परिणाम म्हणजे जगातल्या कोणत्याही वस्तूचा परिव्यय व त्यासाठी केलेल्या गुंतवणूकीपासून मिळणारा मोबदला, यांची तुलना करणे केवळ स्वस्तच झाले नाही, ते सत्वर आणि सोयीचेही झाले आहे.

या क्रांतीमुळे गुंतवणूक, उत्पादन प्रक्रिया आणि व्यापार यांचेही वेगाने जागतिकीकरण होऊ शकले. या क्रांतीचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम झाला. तो म्हणजे श्रमाची, श्रमसेवेची आणि प्रामुख्याने भांडवलाची आंतरराष्ट्रीय पातळीवरची गतिक्षमता खूपच वाढली. तसेच, एखाद्या उत्पादनसंस्थेला आपल्या उत्पादन - संयोजनाचे (production organization) पारंपरिक स्वरूप बदलणे अटळ होऊ न बसले. परिणामतः, एकाच उद्योगातल्या वेगवेगळया उत्पादन-संस्थांच्या दरम्यान आंतरराष्ट्रीयिकरणाला चालना मिळाली. उपभोक्त्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार उत्पादनात बदल करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चात बचत साधता आली. अर्थात, गतकाळात वीज, रेल्वे, स्वयंचलित वाहने इत्यादींच्या शोधामुळेही गुंतवणूक आणि व्यापार यांच्यात अशीच वाढ झाली होती; पण माहिती - तंत्रज्ञानाचा, गुंतवणूक आणि व्यापार यांच्या वाढीवर झालेला परिणाम हा खूपच मोठा आणि वेगाने झालेला असा आहे. अशा प्रकारची जी क्रांती असते तिला 'बहुउद्देशीय तंत्रज्ञानविषयक क्रांती' असे म्हणतात. या क्रांतीतून तीन टप्प्यांमधून उत्पादकता वाढ आणि आर्थिक वाढ होते.

पहिल्या टप्प्यात शोधक्षेत्रात (Innovating Sector) उत्पादकता वाढ होते. दुसऱ्या टप्प्यात, उतरणाऱ्या किंमतींमुळे उत्पादन प्रक्रियेतील भांडवलाचे प्रमाण वाढते आणि तिसऱ्या टप्प्यात, नवीन तंत्रज्ञानाशी संबंधित असलेल्या सर्वच भांडवली वस्तूंच्या उत्पादनाच्या संयोजनातच बदल होतात. अमेरिकेत १९९० ते २००१ च्या काळात काही वस्तूंच्या किंमती निम्म्याने कमी झाल्या आणि त्यांचा दर्जाही सुधारला. (म्हणजे, वस्तूंच्या गुणवत्तेतील सुधारणा लक्षात घेतली तर त्यांच्या किंमतींमधील खरी घट निम्म्यापेक्षाही जास्तच होती.) माहिती तंत्रज्ञान (मात) क्षेत्रांत वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या, वेगाने घटणाऱ्या किंमतीमुळे या क्षेत्रात अतिशय मोठ्या प्रमाणात भांडवल - गुंतवणूक झाली आणि त्यातूनही उत्पादकता वाढ झाली. 'अमेरिकन इकॉनॉमिक रेव्ह्यू'च्या मार्च २००१ च्या अंकातील या संदर्भातला जॉरगनसन यांचा लेख महत्त्वाचा

मानला पाहिजे. या लेखात, अमेरिकेच्या उत्पादकतेत वाढ घडवून आणण्यात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचे योगदान कसे आहे, याचे अतिशय सविस्तर आणि सखोल विवेचन त्यांनी केले आहे. १९९० च्या दशकात अमेरिकन अर्थव्यवस्थेचा झालेला विस्तार आणि २००० सालापासून झालेला संकोच, यात मात क्षेत्राचे योगदान कितपत आहे याचा विचार करताना, त्यांनी एक प्रश्नही उपस्थित केला आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचे योगदान हे विधायक स्वरूपाचे असले तरी तो केवळ तंत्रज्ञानविषयक अल्पकालीन धक्का मानायचा की ती अमेरिकेच्या विकास प्रक्रियेमधील कायमस्वरूपी सुधारणा समजायची ? या प्रश्नाचे त्यांनीच दिलेले उत्तर असे आहे की, हे योगदान अल्पकालीन म्हणजे तात्कालिक स्वरूपाचे आहे.

अनेक राष्ट्रांमधील देशांतर्गत उत्पादनात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे योगदान वाढते असल्यामुळे या क्षेत्रात उत्पन्न होणारे धक्के हे अनेक राष्ट्रांमध्ये तेजी-मंदी आणि व्यापार चक्रे यांच्याबाबतीत महत्त्वाची भूमिका बजावतील. विशेषतः जी लहान राष्ट्रे माहिती तंत्रज्ञान वस्तूंच्या उत्पादनात / निर्यातीत विशेषीकरण करीत आहेत, त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय चलननिधीच्या अंदाजानुसार माहिती तंत्रज्ञानाच्या निर्यातीमधील १० टक्के घटीमुळे मलेशियाचे उत्पन्न २.५ टक्क्यांनी, सिंगापूरचे १.८ टक्क्यांनी, कोरियाचे १.७५ टक्क्यांनी, थायलंडचे १.० टक्क्यांनी, जपानचे ०.७५ टक्क्यांनी आणि चीनचे ०.४ टक्क्यांनी कमी होईल.

माहिती तंत्रज्ञान क्रांतीमुळे गुंतवणूक, व्यापार आणि वित्त या तिघांचे आंतरराष्ट्रीय संबंध खूपच दृढ झाले आहेत. या क्रांतीचा आणखी एक अतिशय महत्त्वाचा परिणाम होणार आहे. या तीन माध्यमांतून स्थूल स्वरूपाची आर्थिक अस्थिरता आणि व्यापार चक्रे वेगवेगळ्या देशांमध्ये पसरतील. यादृष्टीने विचार केला तर इतर उत्पादन संस्थांच्या मानाने, माहिती तंत्रज्ञान संस्थांचेच जागतिकीकरण अधिक झाले आहे, असे म्हणावे लागेल. त्यांची यंत्रसामग्री आणि संगणकीय आज्ञावली यांचे जागतिकीकरण तर झाले आहेच; पण त्यांचे या संदर्भातील आंतरराष्ट्रीय वित्तीय संबंधही घट्ट झाले आहेत. विशेषतः त्यांच्या शेअर्सच्या किंमतींबाबतचे संबंध दृढ झाले आहेत. परिणामतः माहिती तंत्रज्ञान संस्था या व्यापार चक्रांच्या आंतरराष्ट्रीय वाहक बनत चालल्या आहेत. अलीकडच्या काळातली प्रचंड अशी भांडवलाची आंतरराष्ट्रीय गतिक्षमता लक्षात घेतली तर असे म्हणता येईल की एका राष्ट्राच्या वित्तीय परिस्थितीचा परिणाम म्हणून इतर राष्ट्रांमधील मालमत्तांच्या विशेषतः शेअर्सच्या किंमती प्रभावित होऊ शकतात. समजा, एखाद्या

राष्ट्रात पैशाच्या प्रमाणात वाढ झाली किंवा त्या राष्ट्रातील व्याज दर कमी झाले तर याचा परिणाम म्हणून त्या राष्ट्राकडून इतर राष्ट्रांकडे भांडवलाचा ओघ वाहू लागतो. याचबरोबर त्या राष्ट्रांमधल्या शेअर्सच्या किंमती वाढतात. उदाहरणार्थ, 'जी - सात' राष्ट्रांमधले वाढलेले पैशाचे प्रमाण आणि अमेरिका किंवा प्रमुख युरोपीय औद्योगिक राष्ट्रांमधल्या शेअर्सच्या किंमती यांच्या दरम्यान अशाच प्रकारच्या हालचाली दिसतात. एका राष्ट्रातील पैशाच्या वाढीतील अस्थिरता इतर राष्ट्रांमधल्या शेअर बाजारात अस्थिरता निर्माण करते. जर विकसनशील राष्ट्रांमध्ये भांडवल नियंत्रण नसेल तर औद्योगिक राष्ट्रांमधल्या वित्तीय परिस्थितीचा परिणाम, अशा राष्ट्रांमधल्या शेअर बाजारांवर आणि व्याज दरांवर होतो. तसेच शेअर्स व मालमत्तेच्या किंमतीतील चढउतारांमुळे ग्राहकांच्या संपत्तीत चढउतार होऊन त्याचे परिणाम एकूण मागणीच्या चढउतारांच्या स्वरूपात होतात.

## भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

संरचनात्मक सुधारणा आणि १९९१ पासून स्वीकारलेले उदारीकरण यांच्यामुळे १९९१-९२ ते १९९३-९४ या काळात भारताच्या उत्पन्नाच्या वाढीचा दर मंद होता. नंतरच्या तीन वर्षांच्या काळात तो ७ टक्क्यांच्या आसपास राहिला. नंतरच्या ४ वर्षांमध्ये मात्र कमी होत होत २००० मध्ये तो ३.९ टक्के झाला. 'सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन'च्या (CSO) अंदाजानुसार, २००१-२००२ मध्ये भारताचे देशांतर्गत उत्पन्न ५.४ टक्क्यांनी वाढले असावे, भारतीय शेती-क्षेत्राची असमान आणि असमाधानकारक कामगिरी व या क्षेत्रातील मूल्यवर्धिताच्या वृद्धीचा अल्पदर यांचा हा परिणाम होता. जागतिक मंदी हे जरी, २०००मध्ये भारताच्या उत्पन्न वाढीचा दर कमी असण्याचे कारण असले तरी शेतीक्षेत्राचा घसरलेला वृद्धीदरच त्याला प्रामुख्याने कारणीभूत होता. भारताच्या उत्पन्नामधील शेतीक्षेत्राचा वाटा २५ टक्क्यांपर्यंत कमी झाला असला तरी उद्योग, बांधकाम आणि सेवाक्षेत्र या क्षेत्रांचा, शेतीक्षेत्रातील उत्पादनाशी आणि मागणीशी असलेला संबंध अजूनही महत्त्वपूर्ण आहे. जेव्हा या इतर क्षेत्रांमधील वाढीचा दर कमी होतो, तेव्हा त्याला शेतीक्षेत्राची असमाधानकारक कामगिरीच अधिक जबाबदार असते.

रिझर्व्ह बँकेच्या २००१ च्या अहवालामध्येही असे म्हटले आहे की, औद्योगिक क्षेत्रातील मंदीची परिस्थिती पालटवायची असेल तर आर्थिक सुधारणांचा विस्तार, शेती-क्षेत्रापर्यंत नेऊन तो वाढविला पाहिजे. या क्षेत्राची मोठ्या प्रमाणावर वाढ केली

पाहिजे. जागतिक मंदीच्या या चर्चेतून आपल्याला बराच बोध घेता येण्यासारखा आहे. एक, शेतीक्षेत्रातल्या वाढीसारख्या देशांतर्गत घटकाकडे दुर्लक्ष केल्यास ते आत्मघातकी ठरते. दोन, जागतिक स्तरावर जी व्यापार चक्रे निर्माण होतात, त्यांच्यापासून आपण आपल्याला सुरक्षित ठेवू शकत नाही. तसेच, अंतर्गत अथवा बाह्य क्षेत्रात निर्माण होणाऱ्या वित्त व भांडवल बाजाराच्या धक्क्यांपासूनही आपण आपल्याला सुरक्षित ठेवू शकत नाही. तीन, यासाठी आपण स्वतःच या गोष्टींचा अनुभव घ्यायला पाहिजे, असे नाही. इतर राष्ट्रांच्या अनुभवावरून आपण बोध घेतला पाहिजे. एकूण जागतिक परिस्थितीचा विचार केला तर भारताला माहिती तंत्रज्ञान उद्योग अधिक विकसित करणे क्रमप्राप्त आहे. आणि हे करीत असतानाच तेजी-मंदीतून निर्माण होणारी उत्पादनातील अस्थिरता सहन करण्याची आपली शक्तीही आपल्याला वाढवावी लागेल. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा विकास करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानवी भांडवल व भौतिक आणि वित्तीय साधनांचे क्षेत्र (physical and financial infrastucture) यांचा आपल्याला सातत्याने विकास करावा लागेल.

जागतिकीकरण झालेल्या व्यापार व वित्तीय व्यवस्थेशी आपण जसजसे अधिक संलग्न होत जाऊ, तसतशी आपल्याला, मालमत्तांच्या किंमतींमधील मोठे धक्के सहन करण्याची तयारी ठेवावी लागेल. त्यासाठी आपली वित्तीय व्यवस्था आपल्याला बळकट करावी लागेल. तसेच लवकर परिणामकारक ठरू शकतील अशा उपाययोजना करण्यासाठी वित्तीय आणि राजकोषीय धोरणांमध्ये अनुरूप असे बदल करावे लागतील.

परदेशातील मालमत्तांच्या किंमतींमधील चढ-उतारांची वादळे आपल्याकडे झेप घेत असतील तर आपल्याला, योग्य ठिकाणी आणि भक्कम अशा खिडक्या पाहिजेत आणि त्या अशा असल्या पाहिजेत की आवश्यक तर त्या पटकन बंद करता येतील आणि गरजेनुसार काळजीपूर्वक उघडताही येतील. जर आपल्या घरात विजेची अद्यावत उपकरणे किंवा पंखे वगैरे असतील तर विजेचा धक्का बसणार नाही अशी यंत्रणा लावण्याची खबरदारी घ्यायला हवी; तद्वतच आपली वित्तीय व राजकोषीय व्यवस्था जर पुरेशी बळकट केली, तरच मालमत्तांच्या आंतरराष्ट्रीय किंमतींमधील आंदोलनांपासून आपण सुरक्षित राहू शकू.

*(संदर्भ - 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली' २४ मे २००३, मधील विकास चित्रे यांच्या 'ग्लोबल स्लोडाऊन अँड इंडियन इकॉनॉमी' या लेखावरून)*

औद्योगिक

# अमेरिकेतील बेरोजगारी व भारतातील रोजगारी

अमेरिकेच्या अर्थ व राजकारणात, अलीकडे, चीन व भारत या देशांवर टीका करण्यात येत आहे. अमेरिकेच्या बाजारपेठेत चिनी वस्तूंचा भरणा होतो आहे आणि जागतिक व्यापाराबाबत उभयपक्षी काही तेढही निर्माण होत आहे म्हणून चीनवर टीका होत आहे. तर भारताच्या संदर्भात असे दिसते की, परदेशांतून मिळणाऱ्या स्वस्त श्रमांचा उपयोग करून घेण्याच्या सोयीमुळे (आउटसोर्सिंग), अमेरिकेतील अनेक कंपन्यांमधील संगणक -तंत्रज्ञानाशी संबंधित नोकऱ्या भारतातील युवावर्गाला उपलब्ध होत आहेत. याला कारण म्हणजे, भारतात इंग्रजी भाषा व संगणक वापरता येणाऱ्या नवयुवकांची संख्या वाढत आहे. अमेरिकेतील नोकऱ्या बाहेरदेशांत जाण्याच्या या प्रकाराविरूद्ध अमेरिकेतील नागरिकांमध्ये आता जागरूकता निर्माण झाली आहे. कारण अमेरिकेतील बेरोजगारी वाढलेली आहे. त्यातच, यावर्षी, म्हणजे नोव्हेंबर २००४मध्ये अमेरिकेत निवडणुका होणार आहेत. त्यामुळे याविषयात राजकीय रंगही भरू लागला आहे.

गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात, सॅनफ्रान्सिस्को येथे परदेशांतून काम करून घेण्यासंबंधी एका अधिवेशनात चर्चा करण्यात आली. झाले. तेव्हा अमेरिकेतील संगणकतज्ज्ञांनी तेथे निदर्शने केली. या निदर्शकांना, अमेरिकेतील कामगार संघटनांमध्ये दबदबा असलेली एक संघटना - 'द कम्युनिकेशन्स वर्कर्स ऑफ अमेरिका' या संघटनेच्या एका प्रांतीय गटाचा पाठिंबा होता. या प्रांतीय गटाचे नाव 'वॉशिंग्टन अलायन्स ऑफ टेक्नॉलॉजी वर्कर्स' किंवा 'वॉशटेक' असे आहे. न्यूयॉर्क येथे 'द ऑर्गनायझेशन फॉर द राईटस् ऑफ अमेरिकन वर्कर्स' किंवा 'टोरॉ' (TORAW) या संघटनेने जुलै महिन्यात निदर्शने केली. अमेरिकेतील कर्मचाऱ्यांच्या या भावनांना आणखी एक टेकू मिळाला तो म्हणजे, ऑक्टोबर महिन्यात सॉफ्टवेअरसंबंधी झालेल्या एका परिषदेत इंटेल या प्रसिद्ध कंपनीचे अध्यक्ष अँडी ग्रोव्ह यांनी असा इशारा दिला की, "यापुढील दशकात, संगणकीय कामकाजाच्या संदर्भातील अमेरिकेतील अनेक नोकऱ्या, चीन व भारत या देशांकडे जाऊ शकतील. अमेरिकेतील कंपन्यांचा एकूण खर्च व विशेषतः कर्मचाऱ्यांवर पगार व सोयी-सुविधांपोटी होणारा खर्च वाढत असल्याने

कंपन्यांना उत्पादकता वाढवावी लागत आहे आणि त्यांना खर्चात बचतही करावी लागत आहे. त्यामुळे आपल्या इंटेल या कंपनीलाही भारताकडून काम करवून घेण्याशिवाय पर्याय नव्हता." हा विषय इथपर्यंत मर्यादित राहिला असता तर गोष्ट वेगळी होती. पण आता अमेरिकेतील 'लेजिस्लेटर्स' या विषयात रस घेत् आहेत. यावर्षी होणाऱ्या निवडणुका डोळ्यांपुढे ठेवून या लोकहिताच्या विषयात त्यांनी रस घेतला आहे, अशीही चर्चा आहे.

ऑक्टोबर महिन्यात अमेरिकेतील 'हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज्'च्या लघुउद्योगसमितीची एक सभा झाली. त्यातही हा विषय प्रामुख्याने चर्चेत होता. तेव्हा या समितीचे अध्यक्ष व इलिनॉईस प्रांताचे प्रतिनिधी डोनाल्ड मँझुलो यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, "अमेरिकेच्या नागरिकांना नोकऱ्या नसतील तर त्यांची खरेदीशक्ती कमी होईल, यामुळे अमेरिकेचेच नुकसान होईल. तेव्हा आपण येथील किती नोकऱ्या परदेशी नागरिकांना देणार आहोत ?" त्यांची ही शंका अनाठायी नाही, हे दर्शविणारे एक सत्य उदाहरण आहे; ते कॅलिफोर्नियातील संगणक अभियंता असलेल्या नताशा हंफ्रिज हिचे. पाम इंक या कंपनीतून तिला ऑगस्टमधून कामावरून कमी करण्यात आले. काही महिन्यांनी या कंपनीने तिला भारतातील अभियंत्यांना ती करीत असलेले काम शिकविण्यासाठी भारतात पाठविले. भारतातील ज्या नवयुवकांमुळे आपली नोकरी गेली, त्यांनाच आपण करीत असलेले काम शिकविण्याचा मनस्ताप झाल्याने शेवटी ती या प्रकारांविरूद्ध निदर्शने करणाऱ्या 'टेक्सयुनायटेड' या संघटनेत सहभागी झाली.

औद्योगिक कंपन्यांमधील काही अधिकारी असे म्हणतात की, अमेरिकेने इतर देशांमधील तज्ज्ञमंडळींना अमेरिकेत काही ठराविक वर्षांसाठी (म्हणजे किमान ६ वर्षे) काम करण्यासाठी 'एच-१बी' असा व्हिसाचा प्रकार ठेवला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्याची संख्या भारतासाठी ६५ हजारावरून १ लाख ९५ हजारापर्यंत अशी वाढविल्याने अमेरिकेत भारतातील तज्ज्ञांना नोकरी मिळणे सोपे गेले. या व्हिसावरील कर्मचाऱ्यांनी अमेरिकेत डॉलर्समध्ये मिळणारा पगार जर रुपयांत बदलून घेतला तर भारतातील इतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत खूप जास्त पगार मिळतो. म्हणून हा व्हिसा मिळवून अमेरिकेत काही वर्षे तरी काम करायचे असे अनेक भारतीयांचे स्वप्न असते.

व्हिसाच्या या प्रकारातून आणखी एक प्रश्न असा उद्भवला आहे की, अमेरिकेत मिळालेल्या अनुभवाच्या आधारे भारतीय किंवा इतर देशीय नागरिक आपल्या देशात परत जाऊन नवीन उद्योग सुरू करून अमेरिकेतील उद्योगांना आव्हान उभे करतात.

हे नवीन उद्योजक आपल्या देशातील रोजगाराच्या संधी वाढवितात व अमेरिकेतील उद्योगांना मात्र आपला खर्च कमी करण्याच्या उद्देशाने त्यांना काम द्यावे लागते. म्हणून आता या व्हिसाद्वारे अमेरिकेत नोकरी करणाऱ्यांची संख्या कमी करण्यासाठी दरवर्षी फक्त ६५ हजार व्हिसा देण्यात येतील, असे पूर्वीचेच धोरण अमेरिकेने, १ ऑक्टोबर २००३ पासून परत लागू केले आहे.

या सर्व प्रकारांमुळे अमेरिकेतील नऊ प्रांतांमधील 'लेजिस्लेटर्स', अमेरिकेतील विविध प्रकारच्या नोकऱ्या बाहेरदेशी जाऊ नयेत, यासाठी कायदेशीर लढा देत आहेत. अमेरिकेतील नागरिकाला नोकरीवरून काढून त्या जागेवर भारत किंवा इतर देशांमधील नागरिकाला नोकरी देणे बेकायदेशीर ठरविण्यात यावे, तसेच आपल्या कंपनीचे काम परदेशी न पाठविणाऱ्या कंपन्यांना करात सवलती आणि परदेशात काम पाठविणाऱ्या कंपन्यांना जास्त कर भरण्याची शिक्षा असावी, अशाही काही सूचना पुढे येत आहेत.

गंमत म्हणजे, अमेरिकेची अर्थव्यवस्था मजबूत होती तेव्हाही हे सगळे असेच चालत होते, पण त्याविरुद्ध कोणीच आवाज उठविला नाही. मात्र, २००० मध्ये 'डॉटकॉम'चा बुडबुडा फुटल्यानंतर अमेरिकेतील अर्थव्यवस्था अडचणीत आली व नागरिक एकदम जागे झाले. मग या प्रकाराविरुद्ध ओरड करण्यास सुरूवात झाली. तरीदेखील अमेरिकेत या प्रकरणी दोन गट पडले आहेत. एका गटाला वाटते की, अमेरिकेतील नोकऱ्या बाहेर जाण्याचे प्रमाण सध्या फक्त २ टक्के आहे. भविष्यात ते वाढले तरी ६ किंवा ७ टक्के एवढेच वाढेल. तसेच सध्या अमेरिकेत नोकरी करण्यास योग्य अशा तरूण व मध्यमवयीन नागरिकांची संख्याही वाढलेली आहे. नजीकच्या भविष्यात सेवानिवृत्त होणाऱ्यांची संख्या वाढेल, मग अमेरिकेत असा प्रश्न निर्माण होणार नाही.

दुसऱ्या गटाच्या मते, आणखी एक वेगळी कारणमीमांसा अशी की, संगणकाच्या क्षेत्रातील जेवढ्या नोकऱ्या परदेशांमध्ये उपलब्ध होतात, तेवढीच त्या देशांमधील नागरिकांची उच्चतंत्रज्ञानाबाबतची गरज वाढते. हे उच्च तंत्रज्ञान व नवनवीन संगणक त्यांना अमेरिकेतील कंपन्यांकडूनच घ्यावे लागते. म्हणजे अमेरिकेतील अशी उत्पादने तयार करणाऱ्या कंपन्यांना हे फायदेशीर ठरतच असते. 'मॅककिन्सी' संस्थेच्या अलिकडच्या एका अभ्यासानुसार अमेरिका या प्रकारात एक डॉलर खर्च करते तेव्हा, अमेरिकेला त्यापेक्षा जास्त (१.१२ डॉलर) परतावा मिळतो, असे आढळले आहे,

भारताला मात्र फक्त ४० सेंटस् मिळतात. या पार्श्वभूमीवर भारतात राहून अमेरिकेतील कंपन्यांचे काम येथील संगणकांवर करून त्यांना परत अमेरिकेत इंटरनेटच्या मदतीने पाठवायचे असा व्यवहार सध्या भारतात वाढला आहे. भारतातील अशा कंपन्यांना 'बिझिनेस प्रोसेसिंग आऊटसोर्सिंग' (BPO) असे म्हणतात. दुसरा प्रकार आहे 'कॉल सेंटर्स' (Call Centers). म्हणजे जगभरातील विविध कंपन्यांच्या ग्राहकांना फोनवरून व संगणकावरून सेवा उपलब्ध करून देणे. या कंपन्यांना डॉलर्समध्ये पैसे मिळतात आणि त्यांना भारतातील कर्मचाऱ्यांना इतर नोकऱ्यांच्या तुलनेत खूप जास्त पगार (रुपयांमध्ये) देता येतो. उदाहरणार्थ, भारतातील संगणकाच्या क्षेत्रात, वरील कंपन्यांमध्ये, दरमहा किमान १० ते १५ हजार रुपये पगारावर नोकऱ्या मिळण्यास सुरू होते. बारावी व त्यानंतर संगणकाचा किमान तीन वर्षांचा मूलभूत अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या वीस-बावीस वर्षाच्या नवयुवकांना एवढा पगार दुसऱ्या क्षेत्रांत मिळेलच याची खात्री देता येत नाही. शिवाय हा पगार वाढत जाऊन ते ३५ ते ४० हजार रुपये पगार दरमहा मिळवू लागले आहेत. याच कामाला अमेरिकेत किमान दुपटीपेक्षा जास्त पगार द्यावा लागतो. भारतात, संगणक शिकण्यात युवकांची चढाओढ चालू आहे ती यासाठी.

अमेरिकेत या आऊटसोर्सिंगविरुद्ध ओरड चालू असून, राजकीय दबाव आल्यामुळे लेहमॅन व डेल या कंपन्यांनी भारतातील कंपनीला दिलेले काम मागे घेतले आहे. अर्थात, असे करताना त्यांनी कारण मात्र दुसरेच दिले आहे, ही बाब वेगळी. असे असले तरी भारतातील संगणक कंपन्यांचे काम दिवसेंदिवस वाढत आहे. २००३ - २००४ या वर्षांत आऊटसोर्सिंगमुळे भारतात किमान २.८ लाख नोकऱ्या उपलब्ध होत असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. दरम्यान, आऊटसोर्सिंगचा हा निवडणुकीतील एक राजकीय मुद्दा ठरू नये आणि अमेरिका व भारत यांच्यातील परस्परसंबंध ताणले जाऊ नयेत, असे वाटणाऱ्या, एका अमेरिकन शिष्टमंडळाच्या गटाने यंदाच भारताला भेट दिली. त्यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर भारतातील संगणकउद्योगाशी संबंधित 'नॅसोकॉम' या सर्वात मोठ्या संस्थेचे अध्यक्ष किरण कर्णिक यांनी आपली भूमिका बदलली. आता या संघटनेने, भारतातील संगणकउद्योगाच्या यशाचे श्रेय हे भारताचे नसून ते अमेरिकेच्याच आर्थिक व औद्योगिक धोरणाचे आहे, असे म्हणण्याचे ठरविले आहे.

अमेरिकेच्या यासंबंधीच्या नाराजीत आता आणखी एका देशाची भर पडणार आहे, ती म्हणजे चीनची. अर्थात, चीनचे आव्हान भारतातील संगणकक्षेत्रालाही पेलावे लागणार आहे. विविध प्रकारची ग्राहकोपयोगी उत्पादने तयार करण्यात चीनने आघाडी

मिळविली आहेच; पण इंग्रजी भाषा येत नसल्याने बहुसंख्य चिनी नागरिक संगणकाच्या क्षेत्रातील या प्रकारच्या कामापासून अलिप्त राहिले होते. गेल्या काही वर्षांमध्ये, चीनमध्ये संगणक साक्षरता वाढू लागली आहे. आता त्यांनी इंग्रजी भाषेवरही आपले लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. भारताच्या संगणकक्षेत्राशी तुलना करण्याचे चीनने ठरविले आहे. भारताप्रमाणेच चीनमध्ये लोकसंख्या भरपूर आहे, त्यामुळे अमेरिकेतील कंपन्यांचे काम चीनकडे ओढून घेण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत.

चीनच्या दक्षिण भागातील शहरांमध्ये आणि शांघाय व बिजिंग येथे संगणक कंपन्यांचे काम जोरात आहे. शांघाय शहरात जपानी व कोरियन भाषा येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असल्याने त्या देशांमधील संगणकाशी संबंधित काम येथून करणे चीनला फारच सोयीचे झाले. हाँगकाँगमधील कामही चीनमध्ये तुलनेने कमी पगारावर करून मिळते. पण इंग्रजी व विशेषतः अमेरिकन उच्चार समजेल असे इंग्रजी चीनमधील नागरिकांना येत नाही. आता ही उणीव भरून काढण्यासाठी चीनने बहुराष्ट्रीय कंपन्यांचे सहकार्य घेतले आहे.

आय.बी.एम. या अमेरिकेतील कंपनीने येत्या तीन वर्षांत चीनमधील विविध शहरांमधून किमान १ लाख संगणकतज्ज्ञ तयार करण्याचा करार केला आहे. भारतातील एन.आय.आय.टी सारख्या संगणकशिक्षण देणाऱ्या संस्था चीनमध्ये किमान शंभरावर शिक्षणकेंद्रे उघडून बसल्या आहेत. यातून २० ते २५ हजारांपेक्षा जास्त संगणकतज्ज्ञ बाहेर पडतील असा प्राथमिक स्वरूपाचा अंदाज आहे. किमान ४० लाख नागरिकांना इंग्रजी भाषा येऊन ते संगणकतज्ज्ञ व्हावेत, यासाठी चीनने प्रयत्न करायला हवे, असे चीनमध्ये म्हटले जाते. भारतातील संगणकाच्या क्षेत्रात द्याव्या लागणाऱ्या पगारापेक्षाही कमी पगार अमेरिकन कंपन्यांना चीनमध्ये द्यावा लागतो. उदाहरणार्थ, चीनमध्ये ज्या संगणकीय कामासाठी ५०० डॉलर्स खर्च होतात, त्या कामासाठी भारतात ७०० ते ८०० डॉलर्स व अमेरिकेत ४०००डॉलर्स खर्च होतात. या सर्व बाबी लक्षात घेता इ.स. २००६ मध्ये भारत व चीन या दोन देशांना संगणकाच्या क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न सारखे राहील, असाही एक अंदाज आहे.

अमेरिकेसमोर सध्या भारताचे आव्हान असले तरी भविष्यात अमेरिकेसमोर चीनकडून व भारतासमोरही चीनकडून आव्हान उभे राहण्याची शक्यता जास्त आहे.
*(संदर्भ - एफ.ई.ई.आर., द इकॉनॉमिस्ट, बिझिनेस वीक, इकॉनॉमिक टाइम्स)*

■■

औद्योगिक

# बांगलादेश : कापड उद्योग व अर्थव्यवस्था अडचणीत ?

भारताचा सख्खा शेजारी असलेला बांगला देश हा १४ कोटी लोकसंख्येचा देश. १९४७ मध्ये फाळणी होऊन भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा पाकिस्तान हा देश जगाच्या नकाशावर उदयास आला. भारताच्या वायव्येला मुस्लिम बहुसंख्य असलेला प्रदेश म्हणजे पश्चिम पाकिस्तान (सध्याचा पाकिस्तान), आणि भारताच्या पूर्वेकडे मुस्लिम बहुसंख्य असलेला प्रदेश म्हणजे पूर्व पाकिस्तान, अशी विभागणी झाली. या पूर्व पाकिस्तानने १९७१ मध्ये अतिशय निकराचा लढा देऊन व भरपूर रक्त सांडवून पश्चिम पाकिस्तानपासून स्वातंत्र्य मिळविले आणि बांगला देश हे एक नवे राष्ट्र स्थापन झाले. स्थापनेपासून या देशाला गरिबीच्या भुताने पछाडले आहे आणि ते अजूनही त्याच्या मानगुटीवर आहे. त्यातच वर्षा-दरवर्षाआड येणाऱ्या पुरांमुळे होणारी वाताहात ही देखील तेथील एक कायमस्वरूपी घटना झाली आहे. या सर्वांवर कहर म्हणजे तेथील राजकारण अतिशय भ्रष्ट आहे. अशा परिस्थितीत येथील नागरिकांना आधार सापडला होता तो या देशाचा महत्त्वाचा कणा असलेल्या कापड उद्योगाचा.

गेली तीस वर्षे या कापडउद्योगाने अनेकांच्या रोजीरोटीचा प्रश्न सोडविला आहे. मात्र, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत, आता यावर्षी, हा कणा मोडून पडण्याची शक्यता निर्माण झाली असून, या उद्योगावर अवलंबून असणाऱ्या लाखो लोकांच्या उदरनिर्वाहाचे काय करायचे, असा अतिशय गंभीर प्रश्न येथे उभा ठाकला आहे. कारण, कापड उद्योगाच्या निर्यातीसंबंधीचा 'मल्टीफायबर अरेंजमेंट' असा करार यावर्षी डिसेंबरपासून संपुष्टात येणार आहे.

जागतिक पातळीवर, ५०० बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढी मोठी उलाढाल असणाऱ्या कापडउद्योगाचे नियंत्रण करणारा 'मल्टीफायबर अरेंजमेंट' असा एक करार आहे. या करारांतर्गत वस्त्र व तयार कपडे निर्यात करणाऱ्या देशांना एक ठराविक कोटा देण्यात आला आहे. तेवढीच निर्यात त्यांना करता येत होती. उरलेली निर्यात करण्यासाठीचा मार्ग इतर देशांना उपलब्ध होता. त्यामुळे गरीब देशांना कापड उद्योगाच्या निर्यातीत वाव मिळत होता. त्यांच्या उत्पादनाला ठराविक बाजारपेठ उपलब्ध असल्याने, ठराविक टन

उत्पादन करण्यात त्यांना अडचण नव्हती. अशा देशांच्या निर्यातीचा ठराविक कोटा इतर काही देशांच्या मदतीने पूर्ण केला जात आहे. उदाहरणार्थ, अमेरिका व अन्य देशांमधील कंपन्या बांगलादेशातील स्वस्त श्रमांचा उपयोग करून घेत होत्या व आहेत. म्हणजे अमेरिकेतील वॉलमार्टसारखा मोठा उद्योगसमूह बांगलादेशाकडून तयार कपडे विकत घेत होता. यामुळे बांग्लादेशातील हजारो लोकांना रोजगार उपलब्ध करून देता येत होता. 'मल्टीफायबर अरेंजमेंट'मुळे, अमेरिका व युरोप वा अन्य देशांमधील कपड्याच्या बाजारपेठेत या देशांचे हात पोचू शकले होते आणि अतिशय स्वस्तात कपडे तयार करणाऱ्या चीनसारख्या देशांची घोडदौड यामुळे रोखली गेली होती.

जागतिक व्यापार संघटनेच्या उरूग्वे येथे झालेल्या चर्चेच्या वेळी विकसित देशांनी 'मल्टीफायबर अरेंजमेंट' प्रमाणे असलेला कापडनिर्यातीसंबंधीचा कोटा रद्द करण्यात यावा असे तत्त्वत: मान्य केले. कारण व्यापार संघटनेच्या खुल्या व मुक्त व्यापाराच्या संकल्पनेच्या विरोधात हा करार त्यांना वाटत होता. त्यामुळे २००४ च्या अखेरीला हा करार संपुष्टात आणायचा असे ठरले. म्हणजे बांगलादेशासारख्या देशांना मिळणारा निर्यातीचा ठराविक कोटा रद्द होईल. मग ही बाजारपेठ खुली झाल्याने त्यात मोठी स्पर्धा असेल व या स्पर्धेत कमी किंमतीत चांगल्या दर्जाचे वस्त्र व तयार कपडे देणाऱ्या चीनसारख्या देशांना, संपूर्ण जगातील अर्ध्यापेक्षा जास्त बाजारपेठ काबीज करता येईल. बांगलादेशासारख्या देशांची निर्यात कमी होईल. कारण, त्यांच्यापेक्षा कमी किंमतीत जो देश तयार कपडे देईल, त्या देशाकडून वॉलमार्टसारखे उद्योगसमूह कपडे विकत घेऊ शकेल.

याचा परिणाम असा होईल की, बांगलादेशातील नागरिकांना आतापर्यंत यातून उपलब्ध होणारा रोजगार यापुढे मिळणार नाही. या देशासाठी हा प्रश्न गंभीर आहे; कारण, या देशाची अर्थव्यवस्था या कापडनिर्यातीच्या उद्योगावर उभी आहे. देशाच्या एकूण उत्पन्नापैकी ८० टक्के वाटा या निर्यातीतून मिळणाऱ्या पैशांचा आहे. कापडनिर्यातीच्या या उद्योगात किमान १८ लाख नागरिकांना रोजगार मिळालेला आहे. त्यात ८५ टक्के स्त्रिया आहेत. अभ्यासकांच्या अंदाजाप्रमाणे किमान १० लाख नागरिकांच्या नोकऱ्या यामुळे संपण्याची शक्यता आहे. तसेच कापडउद्योगाशी संबंधित इतर लघुउद्योगांमधील लाखो नागरिकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. या नागरिकांना सरकारतर्फे कोणतीही सामाजिक-आर्थिक सुरक्षितता नाही किंवा बेरोजगारी भत्ताही नाही. त्यामुळे या नागरिकांचे भविष्य सध्यातरी अंधारात आहे.

बांगलादेशातील कापडउद्योगाला नव्या शतकाच्या सुरूवातीपासूनच अशी झळ बसू लागली आहे. अमेरिकेला तयार कपडे पुरविण्यात जे देश आघाडीवर आहेत त्यात बांग्लादेश चौथ्या क्रमांकावर होता. अमेरिकेकडे होणारी निर्यात ही खात्रीची असल्याने बांगलादेश अडचणीत नव्हता, आता मात्र हे चित्र बदलू लागले आहे. अमेरिकेवर ११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या हल्ल्यानंतर याचे परिणाम आणखीनच जाणवू लागले आहेत. तेव्हापासून बांगलादेशातील निर्यातीत मागणीअभावी घट झाल्याने शेकडो कारखाने, बंद पडले. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची घसरण हे एकच कारण यामागे नाही, असे काही अभ्यासकांना वाटते. ऑक्टोबर २००३ मध्ये अमेरिकेच्या वाणिज्य मंत्रालयाने सांगितले की, वस्त्र व तयार कपडे अमेरिकेला पुरविण्यात आता चीन या देशाने प्रथमच आघाडी मिळविली आहे. गेल्या वर्षी अमेरिकेला चीनकडून होणाऱ्या लहान मुलांच्या कपड्यांच्या निर्यातीत ३०६ टक्क्यांनी वाढ झाली. तर, बांगलादेशाकडून होणाऱ्या निर्यातीत १६ टक्क्यांनी घट झाली. चीनकडून होणाऱ्या या निर्यातीमुळे अमेरिकेतील कपड्यांचे स्थानिक उद्योगही अडचणीत आले असून या निर्यातीवर बंधने असावीत, अशी मागणी अमेरिकेच्या व्यापारविषयक समितीने केली आहे.

या व्यापारात चीन या एकाच देशाचा फायदा होत नसून कॅरिबियन व आफ्रिकेतील काही देशही (सबसहारन आफ्रिका) अमेरिकेच्या बाजारपेठेत उतरले आहेत. या देशांमधील तयार कपड्यांवर अमेरिकेने आयातशुल्क आकारलेले नाही. मात्र बांगलादेशातील कपड्यांवर आयातशुल्क आकारले आहे. अमेरिकेने बांगलादेशाला त्रास देण्यासाठी लक्ष्य केले आहे किंवा काय, अशी शंका बांगलादेशातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने बोलून दाखविली आहे.

बांगलादेशासाठी हा एक आर्थिक व सामाजिक प्रश्न ठरतो आहे. कापडउद्योगातील निर्यातीत मिळणाऱ्या रोजगारामुळे या मुस्लिम देशातील महिलांचे कुटुंबातील व समाजातील स्थान जरासे उंचावले होते. अत्यंत गरिबीत जीवन कंठणारी कुटुंबे या स्त्रियांच्या रोजगारावर अवलंबून आहेत. स्त्रिया फक्त वेश्याव्यवसाय करूनच पैसा मिळवू शकतात, असा गैरसमज येथील तळागाळाच्या समाजात पसरलेला होता. पण कापडउद्योगात स्त्रियांना मिळालेल्या रोजगारानंतर ही परिस्थिती बदलली. स्त्रियांना थोडाफार पैसा व आत्मसन्मान या उद्योगाने मिळवून दिला होता. आता खरोखर हातावर पोट असणाऱ्या या स्त्रिया व त्यांची कुटुंबे यांचे काय होणार असा प्रश्न आहे.

दरम्यान या सर्व परिस्थितीत बांगलादेशात राजकीय पक्षांची धर्मनिरपेक्षता दूर चालली आहे. देश मुस्लिम असल्याने येथे आता इस्लामची पाळेमुळे आणखी घट्ट होताहेत. मुस्लिम मूलतत्त्ववाद जपणाऱ्या आणि बांगलादेश हे इस्लामी राज्य व्हावे, असे आवाहन करणाऱ्या 'जमात - ए - इस्लामी' या पक्षाने बांगलादेशात २००१ मध्ये झालेल्या निवडणुकीत १७ जागा जिंकल्या. या पक्षाने बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीबरोबर तडजोड करून राजकारणातील आपला सहभाग वाढविला आणि धर्मनिरपेक्षता मानणाऱ्या आवामी लीगला सत्तेपासून दूर व्हावे लागले. मंत्रालयात, उद्योग व समाजकल्याण खात्यातील अनेक महत्त्वाच्या पदांवर आता 'जमात -ए -इस्लामी'चे सदस्य आहेत. देशाच्या शहरी व ग्रामीण भागात इस्लामी मूलतत्त्ववादाचे शिक्षण देणाऱ्या शाळा वाढताहेत आणि भारत व म्यानमार या देशांत अतिरेकी कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांना बांगलादेशात आश्रय मिळतो आहे. पण पश्चिमेकडील देशांनी या घटनांची दखल फारशा गांभिर्याने घेतली नसल्याचे आढळते. या पार्श्वभूमीवर, कापडनिर्यातीत घट झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या बेरोजगारीला धार्मिकतेचे खतपाणी मिळेल किंवा कसे याचा नेमका अंदाज बांधणे कठीण आहे.

बांगलादेशाच्या कापडउद्योगात आज निर्माण झालेला प्रश्न हा अचानक उभा ठाकलेला नाही. ही वेळ येणार हे आधीपासूनच माहिती होते. मग या देशाने आधीच उपाययोजना का केली नाही ? खरे म्हणजे, येथील सरकारने यावर फक्त चर्चाच केली, कृती केली नाही, हा खरा मुद्दा आहे. या उद्योगाला मदत करण्यासाठी काय काय करता येईल, यासाठी सरकारने स्वीत्झर्लंडमधील संस्थेचाही सल्ला घेतला होता. या संस्थेने निर्यात वाढण्यासाठी चांगले रस्ते, चांगली बंदरे, प्रभावी दळणवळण व संदेशवहन आणि नोकरशाहीचा अकारण होणारा हस्तक्षेप रोखणे, कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामगारांना चांगले वातावरण पुरविणे व त्यांच्या कामाच्या दर्जात सुधारणा घडवून आणणे अशा सर्व बाबींमध्ये, सरकारने त्वरित सुधारणा करायला हवी, असे सुचविले होते. पण सरकरने यासंबंधी कोणतीच कृती केली नाही असे अनेक अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. एवढी वर्षे न केलेली कामे आता २००४ हे वर्ष संपायच्या आधी कशी होणार ? आता कमी वेळात सरकार किती सुधारणा करणार ? किती कंपन्या तगणार आणि त्यातून किती स्त्रियांचा रोजगार टिकून राहणार ? हे प्रश्न अनुत्तरितच आहेत आणि तरीही अनेक स्त्रियांना मात्र 'अल्ला' आपले रक्षण करेल असेच वाटते आहे.

*(संदर्भ - एफ.ई.ई.आर., इंटरनेट)* ■■

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY



# दक्षिण आशियात इस्लामचा वाढता प्रभाव

जागतिक पातळीवर, अलीकडे, राजकारणात व समाजकारणात मुस्लिम समाज व त्यांची आचारविचार पद्धती यांवर बरीच चर्चा होत आहे. (फ्रान्समध्ये मुलींनी डोक्याला रुमाल बांधावा किंवा कसे या प्रश्नावरून वादळ उठल्याची घटना ताजीच आहे.) ही चर्चा या समाजांतर्गत तर होत आहेच; शिवाय या समाजाबाहेरील इतर अभ्यासकांमध्येही होत आहे. युरोप, अमेरिकेपासून आशियापर्यंत अनेक देशांमध्ये मुस्लिम लोकसंख्या पसरल्याने या चर्चेला वेगळे महत्त्व आले आहे. अशीच एक घटना इंडोनेशिया व मलेशिया या दक्षिण आशियातील देशांमध्ये घडते आहे. जागतिक राजकारणाच्या, व विशेषतः आशियातील राजकारणाच्या दृष्टीने ही घटना महत्त्वपूर्ण ठरू शकेल. या देशांमध्ये अलीकडे इस्लामची पाळेमुळे घट्ट होताहेत, ही ती घटना होय. म्हणजे, या देशांतील व्यवहारात, समाजजीवनात धर्म महत्त्वाचा मानला जाऊ लागला आहे. येथे पुराणमतवादी मुस्लिमांची संख्या वाढते आहे आणि पुराणमतवादी मुस्लिम व मवाळ मुस्लिम यांच्यात वैचारिक मतभेदही होत आहेत. अमेरिकेवर मुस्लिम अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर विविध देशांमधील मुस्लिम समाजात झालेले वैचारिक बदल आणि मुस्लिम समाजातंर्गत असलेले विविध सामाजिक व आर्थिक प्रश्न ही प्रामुख्याने या घटनेची पार्श्वभूमी असावी, असे मानले जात आहे.

पुराणमतवादी मुस्लिम समाज असे मानतो की, इस्लाम हा सर्वश्रेष्ठ आहे. म्हणून हा गट इस्लामचे, म्हणजे शरियतचे कायदे लागू करावे, या मताचा आग्रही आहे. तर मवाळ मुस्लिम लोकशाही मूल्यांना, नवविचारांना, आचारांना जवळ करणारा आहे. हा वैचारिक संघर्ष महत्त्वाचा मानला जात आहे; कारण, याचे परिणाम दूरगामी होण्याची शक्यता आहे. (शिवाय तो कधीही सशस्त्र लढ्यात बदलू शकतो असेही कोणी मानतात.) देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुरक्षा तसेच आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थैर्य, यादृष्टीने याचे परिणाम फार गंभीर होण्याची शक्यता आहे, असे मानले जात आहे. उदाहरणार्थ, इंडोनेशिया हा मोठी मुस्लिम लोकसंख्या असलेला देश आहे. हा देश जर कट्टर मुस्लिमतेकडे झुकला आणि बिगरमुस्लिमांच्या किंवा पश्चिमेकडील राष्ट्रांच्या विरोधात धोरणे आखू लागला, तर या देशातील विविध

क्षेत्रांतील परकीय गुंतवणूक कमी होईल. तसेच येथील व्यापारउद्योगात बऱ्यापैकी आघाडीवर असलेला चिनी समाजही या देशापासून दूर जाईल. यामुळे आर्थिक प्रश्न तर निर्माण होतीलच. शिवाय 'जेमा इस्लामिया' यासारख्या कट्टर मुस्लिम संघटनांचे मात्र फावेल. (ही संघटना मुस्लिम अतिरेक्यांशी संधान साधून आहे, असे म्हटले जाते!)इंडोनेशियाच्या लष्कराचे सेवानिवृत्त जनरल अगस विड्जोयो यांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे की, 'इस्लामीकरणाच्या या लाटेमुळे या देशाचा मूळ पायाच बदलून जाण्याची शक्यता आहे.'

इंडोनेशियाचा पश्चिम जावा भाग हा कट्टर मुस्लिमांचा मानला जातो. या भागातील बांडुंग येथे सर्वत्र इस्लामची खूण असलेले हिरवे झेंडे आढळतात. येथील एका जिल्ह्याचा प्रमुख 'आपण जिंकून आल्यावर शरियत लागू करू,' या घोषणेवर निवडून आला. महत्त्वाचे म्हणजे, हे गैर आहे, असे अनेकांना वाटत नाही. बांडुंग येथील एक रेडिओ पत्रकार केमाल याच्या मते, "यात काहीच चूक नाही. कारण इंडोनेशिया हे इस्लामी राष्ट्र आहे. येथे बहुसंख्य मुस्लिम आहेत. नागरिकांचे धार्मिक जीवन वेगळे व देशातील धर्मनिरपेक्ष सरकार वेगळे. या दोन बाबी पश्चिमेकडील राष्ट्रांमध्ये वेगळ्या असतील, तिथे त्यांचा संदर्भ असेल, इस्लाममध्ये त्याचा काही संदर्भ नाही. शरियत लागू करणे हे येथे धार्मिक कार्य करणे होय. त्याचा सरकारशी काही संबंधच नाही." असे स्पष्टीकरण आपण शरियतचे समर्थन का करतो हे सांगताना त्याने दिले आहे.

केमालसारख्यांच्या विचारांचे अनेक नागरिक इंडोनेशियात आढळतात. हे नागरिक फक्त गरीब वा मागासवर्गीय किंवा समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दुरावलेले असे नाहीत; तर ते मध्यमवर्गीय व पाश्चात्य शिक्षण घेतलेले देखील आहेत. युरोपमध्ये इंजिनियरिंगचे शिक्षण घेतलेल्या एका मुस्लिम नागरिकाने परदेशात वास्तव्यास असणाऱ्या आपल्या दुसऱ्या भावाला, इंडोनेशियाने इस्लामचा मार्ग सोडल्याने इंडोनेशियाची कसे नुकसान झाले, ते सांगितले. या चर्चेनंतर परदेशातील त्या मुस्लिम नागरिकाने मायदेशी परत येऊन सुधारणा करण्याचा निश्चय केला, असे उदाहरण केमालने सांगितले. आपल्या सामाजिक स्थितीत चांगला बदल घडवून आणण्याची क्षमता इस्लाममध्येच आहे, असे येथील नागरिकांना वाटू लागले आहे. असा समज होण्यामागे येथील राजकीय परिस्थिती कारणीभूत आहे, असे म्हटले जाते. ११९८ पासून इंडोनेशियाने लोकशाहीचा मार्ग स्वीकारला. पण समाजातील बहुसंख्य लोकांच्या स्थितीत सुधारणा

होऊ शकल्या नाहीत. आर्थिक वाढीचा दर ४ टक्क्यांवर स्थिर झाला आहे, असे सरकारने म्हटले असले तरी वाढती महागाई व वाढता भ्रष्टाचार रोखणे हे सरकारला जमलेले नाही. दरम्यान, राजकीय स्वातंत्र्य असल्याने इस्लामचा प्रचार व प्रसार मात्र सर्वत्र होऊलागला. बहुसंख्य लोकांना, धर्माचा प्रसार म्हणजे न्याय व स्वातंत्र्य आणि लोकशाहीकडे वाटचाल असे वाटू लागले आहे, असे मुस्लिम बुद्धिवादी गटात मोडणाऱ्या झुहायरी मिरासावी या युवकाचे मत आहे.

इस्लामचा प्रभाव वाढण्यामागे अमेरिकेच्या धोरणांचा देखील हात आहे. मध्यपूर्वेतील देशांबाबत अमेरिकेची धोरणे व सुरक्षेच्या नावाखाली इंडोनेशियाच्या नागरिकांना देण्यात येणारी कठोर वागणूक ही देखील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण करण्यास कारणीभूत ठरली आहे. येथील लोकप्रिय धर्मोपदेशक अब्दुल्ला जिम्नॅस्टियर हे लोकांना सहिष्णुतेचा उपदेश सतत करीत असतात. पण, अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी बाली येथे भेट दिली असता, बुश यांना भेटण्यास या धर्मोपदेशकाने नकार दिला. केमालसारखे युवक तर, 'अमेरिका जगाच्या विनाशाकडे डोळे लावून बसली आहे आणि काही अतिरेकी गट स्थापन करून इंडोनेशिया व इतर देशांमधील मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करीत आहे,' असे उघडपणे म्हणू लागले आहेत. इंडोनेशियातील छोट्या छोट्या मशिदींमध्ये हजेरी लावणारे मध्यमवर्गीय नागरिक देखील इस्लामचा सर्वात मोठा शत्रू अमेरिका आहे आणि ख्रिश्चन व ज्यू यांच्यापासून आपले रक्षण करण्याचा मुस्लिमांचा अधिकार हा कुराणानुसार आहे, असे म्हणू लागले आहेत.

इस्लामचा प्रभाव येथे समाजजीवनात कसा वाढू लागला आहे ते खालील गोष्टींवरून आणखी स्पष्ट होईल. मुस्लिम समाजातील घडामोडी पोचविणाऱ्या 'साबिली' या मासिकाचा खप इंडोनेशियात सर्वात जास्त आहे. इस्लामचा प्रसार करण्यासाठी इंटरनेटचा वापरही होतो आहे. इंटरनेटवर इस्लामच्या भरपूर वेबसाईटस् आहेत. शिवाय ई-मेलच्या मदतीने हजारो संदेशांची देवाण-घेवाणही होत आहे. रमझानच्या महिन्यात इस्लामविरूद्ध वर्तन होणार नाही याची काळजी, हॉटेल्समध्ये दारू विकण्यास कायद्याने बंदी वा तत्सम उपाय योजून घेतली गेली. शाळांमधून इस्लामची तत्त्वे शिकविण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. शरियतनुसार अर्थशास्त्र शिकविण्याचा अभ्यासक्रम विद्यापीठांमध्ये आहे. बँक ऑफ इंडोनेशियाने लोकांच्या मागणीला मान देऊन 'इस्लामिक बँकिंग सिस्टिम' सुरू करण्याची योजना आखली आहे. नागरिकांच्या भावनांचा फायदा राजकीय नेतेही घेत असून इंडोनेशियाचे राजकारण कट्टर इस्लामकडे झुकू लागले आहे.

मलेशियात देखील इस्लामचा प्रभाव वाढतो आहे. येथील 'पार्टी इस्लाम से मलेशिया' किंवा 'पास' (PAS) या विरोधी पक्षाने 'आपण सत्तेवर आल्यास शरियत लागू करू,' असे जाहीर केले आहे. यावर्षी येथे सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. अब्दुल रहमान चे सुह या मलय वंशाच्या शिक्षक नागरिकाने या घोषणेचे स्वागत केले आहे. येथील मुस्लिमांचा लढा यासाठीच आहे, असे मत त्याने व्यक्त केले आहे. तर चिनी वंशाच्या जेम्स वी सारख्या नागरिकाचे धाबे या घोषणेमुळे दणाणले आहे. मलेशियाची लोकसंख्या चिनी वंशाचे व मलय वंशाचे म्हणजे मुस्लिम अशा दोघांमध्ये प्रामुख्याने विभागली गेली आहे. मलेशियात सध्या 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन' (UMNO) ही पार्टी सत्तारूढ असून, अब्दुल्ला अहमद बडावी हे पंतप्रधान आहेत. माजी पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांनी राजकारणातून निवृत्ती जाहीर केल्यानंतर त्यांच्याकडून अब्दुल्ला यांनी अलीकडेच पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली आहेत.

महाथीर मोहम्मद यांनी त्यांचे उपपंतप्रधान अन्वर इब्राहिम यांना भ्रष्टाचार व गैरव्यवहाराच्या आरोपावरून पदावरून काढल्यानंतर त्यांनी 'पास' या संघटनेबरोबर सहकार्य केले. १९९९ च्या निवडणुकांमध्ये 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन' या पक्षाचे उमेदवार ७० टक्के जागांवर निवडून आले असले, तरी 'पास'ने त्यांची अनेक मते मिळविली आहेत ही वस्तुस्थिती आहे. 'पास'ने जिंकलेल्या दोन जागांवर धर्मनिरपेक्ष कायदा गुंडाळून ठेवून, घटनेच्या विरोधी वागून इस्लामचा कायदा लागू करण्याचे प्रयत्न केले आहेत. मलेशियाला मुस्लिम राष्ट्र बनविण्याची आपली योजना व लढा 'पास'ने लोकांपुढे आणण्याचा प्रयत्न अलीकडेच केला आहे. यावर्षी होणाऱ्या निवडणुका जरी 'पास'ला जिंकता आल्या नाहीत तरी भविष्यात आपला पक्ष उभा राहावा यासाठी हे प्रयत्न आहेत, असे 'पास'चे नेते म्हणतात. देशातील तरूण मतदारांची मते मिळविण्याचेही 'पास'चे प्रयत्न आहेत. मलय समाजाचे नेतृत्व 'युनायटेड मलय नॅशनल ऑर्गनायझेशन'कडे असल्याचा या पक्षाचा दावा खोडून काढण्याचा 'पास'चा विचार आहे.

मलेशियाच्या पार्लमेंटमधील इस्लामसमर्थक पक्षाचे एक सदस्य सय्यद अझ्मान सय्यद अहमद यांच्या मते सार्वजनिक व राजकीय पातळ्यांवर इस्लामच्या पद्धती ज्यांना सर्वोत्तम वाटतात, त्यांना आपल्या सामाजिक प्रश्नांवर इस्लामची योग्य व पूर्ण अंमलबजावणी हेच उत्तर सुयोग्य वाटते. आज मलेशियातील समाजात वेगवेगळ्या क्षेत्रांत उच्च पदांवर इस्लामचे समर्थक आहेत. परदेशांमध्ये उच्च शिक्षण घेतलेल्या

आणि मलेशियातील राजकीय प्रक्रियेला विटलेल्या अनेक सुशिक्षित युवकांची १९७० व १९८० च्या दशकांत अरब देशांमधील युवकांशी चर्चा होऊ लागली आणि त्यातून त्यांना असे वाटू लागले की, इस्लाम हेच आपल्या देशातील समस्येवर एकमेव उत्तर आहे, असे सय्यद अझ्मान म्हणतात. इस्लाम धर्माच्या अनुषंगाने शालेय शिक्षण देणाऱ्या मदरशांवर 'अतिरेकी शिक्षण देणाऱ्या शाळा' म्हणून ओरड होते; याबद्दल काळजी व्यक्त करून अझ्मान म्हणतात की, इस्लामचे अनेक कट्टर समर्थक समाजाच्या मुख्य प्रवाहातून व वेगवेगळ्या व्यवसायातून आलेले आहेत. तसेच इस्लामी अतिरेकी देखील समाजाच्या मुख्य प्रवाहातूनच निर्माण झालेले आहेत. इस्लामच्या प्रभावाची कारणमीमांसा वेगवेगळी असली तरी एकंदरीत मलेशियातील राजकारण व समाजकारण हळूहळू इस्लामच्या दिशेने वाटचाल करीत आहे, असे आढळते.

दक्षिण आशियातील इस्लामच्या वाढत्या प्रभावाचा अभ्यास अनेक अभ्यासक व राजकीय तज्ज्ञ आणि मवाळ मुस्लिम विचारवंत करीत आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या या भागात फार पूर्वी इस्लामचे वर्चस्व नव्हते. भारत व चीन येथील व्यापाऱ्यांकडून येथे काही शतकांपूर्वी इस्लामधर्म पोचला. त्यामुळे ज्या समाजाची मुळे मूलतः हिंदू व बौद्ध होती अशा समाजात तो पसरला. त्यामुळे तो एवढा कट्टर न राहता या समाजातील काही परंपरा त्याने मान्य केल्या, असे अभ्यासक म्हणतात. या भागातील समाजाचा एक घटक म्हणून इस्लाम स्थिरावला आणि तो एवढा कडवाही नव्हता. मात्र १९ व्या शतकात दळणवळणाच्या सोयी वाढल्या आणि या भागातील मुस्लिमांचा अरब देशांतील मुस्लिमांशी संबंध प्रस्थापित झाला. मक्केला जाणाऱ्या मुस्लिमांची संख्या वाढू लागली. त्यातून इस्लामच्या समर्थकांनी इस्लामच्या स्थापनेचा व प्रसाराचा अभ्यास केला आणि त्यांच्यामध्ये अरब देशांमधील 'वाहबिझम' (Wahabism - म्हणजे कट्टर व पुराणमतवादी मुस्लिम परंपरासमर्थक) पसरला.

अलीकडच्या काळात सौदी अरेबियातील तेलाचा व्यापार व त्या अनुषंगाने घडलेले आंतरराष्ट्रीय राजकारण, अमेरिकेचा हस्तक्षेप, मुस्लिम राष्ट्रांमधील सामाजिक व आर्थिक प्रश्न, जागतिकीकरण व त्या अनुषंगाने समाजातील होणारे बदल, देशादेशांमधील राजकारण आणि मुस्लिम अतिरेक्यांनी अमेरिकेवर केलेला हल्ला व त्यानंतर उद्‌भवलेले विविध प्रश्न अशा अनेक बाबींचा परिणाम मुस्लिम समाजावर होऊन आता 'इस्लामी मन' आणखी कट्टरतेकडे झुकते आहे, असेही अभ्यासकांना वाटते. *(संदर्भ - एफ.ई.ई.आर., नोव्हेंबर-डिसेंबर २००३, इंटरनेट)* ■■

सामाजिक

# चीनमधील प्रसारमाध्यमे

अलीकडे चीनमध्ये सुधारणांचे पेव फुटले आहे. साम्यवादाची चौकट पूर्णपणे न मोडता विविध विषयांच्या संदर्भात काही लक्षणीय बदल घडवून आणण्याचा सरकारचा प्रयत्न येथे दिसतो आहे. प्रसारमाध्यमेही याला अपवाद ठरलेली नाहीत. प्रसारमाध्यमांच्या संदर्भातील कायद्यात अलीकडे, २००३ मध्ये मोठे बदल झाले आहेत; त्यामुळे चीनमधील करोडो नागरिकांना, विविध सुधारणांची आणि विषयांची माहिती देणारी चिनी वृत्तपत्रे व नियतकालिके स्वतःच या नव्या कायद्याच्या कचाट्यात अडकत आहेत. या कायद्यामुळे चीनमधील अनेक वृत्तपत्रे बंद पडण्याची शक्यता आहे. अर्थात हे असे होणे अटळ होते, अशी भावना येथील धोरणकर्त्यांमध्ये व नागरिकांमध्ये आहे. यासाठी अनेक कारणे आहेत.

पहिले म्हणजे, ही वृत्तपत्रे जणू त्यांच्या मानगुटीवरच बसली होती. म्हणजे झाले होते असे की, अनेक नागरिकांना अनेक वृत्तपत्रे जबरदस्तीने वा दबावाने एकाच वेळी विकत घ्यावी लागत होती. असे होण्यामागील पार्श्वभूमी अशी - चीनमध्ये किमान दोन हजारावर वृत्तपत्रे व नऊ हजारावर नियतकालिके आहेत. त्यातील बहुतांशी वृत्तपत्रे व नियतकालिके ही पक्षीय किंवा विविध सरकारी विभागांतर्फे चालविण्यात आलेली आहेत. सर्व प्रकाशनांना सरकारी प्रायोजक असावेत, अशीही अट चीनमध्ये आहे. सरकारी विभाग असल्यामुळे छोट्या छोट्या गावांमधील नागरिकांपर्यंत या वृत्तपत्रांना पोचणे शक्य होते आणि या नागरिकांनी आपले वर्गणीदार व्हायलाच पाहिजे, असा दबावही त्यांच्यावर आणण्यात येत होता. याशिवाय नागरिकांकडून मोठ्या जाहिराती देखील उकळण्यात येत होत्या. या नागरिकांना हे सर्व सहन करण्यावाचून कोणताही पर्याय नव्हता; कारण, वृत्तपत्रांची वर्गणी न भरता नागरिकांची कर भरणे वा तत्सम सरकारी कामे होणे कठीण होते.

त्यामुळे अनेक जण अशी विविध वृत्तपत्रे व नियतकालिके दबावाखाली विकत घेऊन न वाचताच कचऱ्याच्या टोपलीत टाकत होते. याचा त्रास अगदी पक्षाच्या कार्यकर्त्यांना व नेत्यांनाही झालेला आहे. उदाहरणार्थ, झू युलोंग या एका प्रांतातील खेड्याच्या पक्षसचिवाचे घेता येईल. झू युलोंग यांच्याजवळ कार्यालयीन कामकाजासाठी

दरवर्षी फक्त ३० हजार युवान खर्च करण्याची परवानगी होती आणि अशा दबावाखाली येऊन विविध वृत्तपत्रे व नियतकालिके घेण्यासाठी त्यांचे १ लाख ५० हजार युवान खर्च झाले. साम्यवादी राजवटीत लोकांचे मत तयार करण्यासाठी सरकारने त्यांना योग्य ती माहिती पुरविणे असे अपेक्षित असल्याने, पक्षाचे व सरकारचे नाव पुढे करून अनेक विभागांनी वृत्तपत्रे प्रकाशित करण्यास सुरूवात केली. या वृत्तपत्रांमधून प्रबोधन किती झाले, हा वादाचा मुद्दा असला तरी सरकारी कार्यक्रमांचे व संबंधित अधिकाऱ्यांचे फोटो मात्र त्यात झळकत होते. याचा परिणाम नागरिकांसाठी त्रासदायक ठरला तो वरील उदाहरणाप्रमाणे.

दुसरे म्हणजे, जागतिकीकरणाचा फायदा चीनला करून घ्यायचा आहे. त्यासाठी चीनमध्ये परकीय गुंतवणूक वाढण्याची गरज आहे. या गुंतवणूकदारांची मागणी आहे की त्यांना योग्य व अचूक माहिती मिळावी. साहजिकच सरकारी अधिकाऱ्यांच्या दबावाखाली, विविध विभागांच्या वृत्तपत्रांच्यामार्फत हे होईलच असे नाही. त्यामुळेही अशी वृत्तपत्रे सरकारला नको आहेत. तिसरे म्हणजे, प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात, पश्चिमेकडील देशांमध्ये 'एओएल -टाईम' किंवा 'वॉर्नर ब्रदर्स' सारखे मोठे उद्योगसमूह आहेत; तसे चीनमध्ये नाहीत. चीनमध्ये असे उद्योगसमूह निर्माण व्हावेत, अशी धोरणकर्त्यांची आकांक्षा आहे.

चौथे म्हणजे, परदेशांमध्ये गेलेल्या चिनी नागरिकांनी परदेशांमधील वृत्तपत्रस्वातंत्र्य बघितले आहे. त्यांना देखील मायभूमीत परत आल्यानंतर चांगली वृत्तपत्रे चीनमध्ये असावीत असे वाटणे स्वाभाविक होते. पाचवे म्हणजे, चीनमधील प्रसारमाध्यमे फक्त सरकारी कार्यक्रमांनाच प्राधान्य देतात, असा समज पाश्चात्य देशांमध्ये, चीनमधील माध्यमांबाबत आहे. जागतिकीकरणात सहभागी होताना तो समज देखील चीनच्या नेतृत्वाला दूर करायचा आहे. त्यामुळे अलीकडे चीनच्या प्रसारमाध्यमांनी सरकारी कार्यक्रमांना फार महत्त्व देऊ नये, उलट, इराक -युद्धासारख्या बातम्यांना योग्य ते महत्त्व द्यावे, असे सरकारने म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर चीनच्या धोरणकर्त्यांनी काही पावले उचलण्याचे ठरविले. गेल्या वर्षी, २० जून २००३ रोजी सरकारने अशी घोषणा केली की, यापुढे कोणत्याही वृत्तपत्राने वा नियतकालिकाने सरकारी दबाव आणून नागरिकांना वर्गणीदार करून घ्यायचे नाही आणि दबाव आणून जाहिराती मिळवायच्या नाहीत. यातून विज्ञानाशी संबंधित नियतकालिके मात्र वगळण्यात आली आहेत. या घोषणेमुळे बहुतांश वृत्तपत्रे

बंद पडण्याचीच शक्यता जास्त आहे. पण सरकारला व नागरिकांना त्याचे सुखदुःख नाही. वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी आपला दर्जा राखावा, विक्री वाढवावी आणि स्वतःच स्वत;ची आर्थिक स्थिती मजबूत करावी, असे सरकारला वाटते. या क्षेत्रात मर्यादित प्रमाणात परकीय गुंतवणूकही व्हावी असेही सरकारचे मत आहे. अर्थात, असे असले तरी सरकारला प्रसारमाध्यमांवरील आपले 'संपादकीय नियंत्रण' मात्र अद्याप सोडायचे नाही. त्यामुळे मूळ साम्यवादी विचारांपासून प्रसारमाध्यमांनी दूर जाणे हे सरकारला मान्य नाही.

प्रसारमाध्यमांच्या संदर्भातील या सुधारणांबाबत चर्चा करण्यासाठी चीनमधील दूरचित्रवाणीने एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात सरकारी अधिकाऱ्यांनी देखील हजेरी लावली. असे कार्यक्रम चीनमध्ये क्वचितच होतात. त्यामुळे याचे महत्त्व आहे. या कार्यक्रमांत चीनमधील दूरसंचार व नभोवाणी खात्याचे मंत्री झू ग्वांगचून यांनी तर सरकारची भूमिका स्पष्टच केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, "चीनमध्ये प्रसारमाध्यमांच्या संदर्भात कोणतेही बदल झाले तरी चार गोष्टी मात्र कधीच (म्हणजे नजीकच्या भविष्यात) बदलणार नाहीत. एक, प्रसारमाध्यमे ही सरकारची मुखपत्रे म्हणूनच भूमिका बजावतील. दोन, त्याच्या संदर्भातील व्यवस्थापकीय अधिकार ही पक्षाची बाब राहील. तीन, प्रसारमाध्यमांमधील व्यक्तींची निवड हाही सरकारचा प्रश्न असेल आणि चार, लोकांना आपली मते तयार करता यावीत यासाठी ही माध्यमे त्यांना मार्गदर्शन करतील."

प्रसिद्धी विभागाचे एक उपमंत्री ली कॉंगजून यांनी म्हटले की, "चीनमधील प्रसारमाध्यमांना व्यापारी दृष्टीने आपला व्यवसाय वाढवायचा आहे, शिवाय सरकारप्रती असलेले त्यांचे कर्तव्यही पार पाडायचे आहे." हे कसे करायचे ते सांगताना, त्यांनी एका उद्योगसमूहाचे उदाहरण दिले आहे. 'शानडोंग डाझोंग' वृत्तपत्रसमूहाने २००१ पासून एक वेगळीच योजना राबविली आहे. आपल्या उद्योगसमूहाच्या अंतर्गत त्यांनी वेगवेगळ्या छोट्या कंपन्या स्थापन केल्या. प्रत्येक कंपनीने उद्योगसमूहाची विशिष्ट कामे वाटून घेतली. म्हणजे जाहिरात विभाग, वितरण विभाग अशी. या छोट्या कंपन्यांना परदेशी भांडवल मिळविता आले. संपादकीय विभाग असलेली कंपनी मात्र या मोठ्या उद्योगाने आपल्याकडेच ठेवली; आणि त्यात परकीय भांडवल घेतलेच नाही. त्यामुळे त्यांच्या लेखनस्वातंत्र्यावर परकीय दबाव येण्याचा प्रश्नच उरला नाही. सरकारी विभागांकडून चालविण्यात येणारी वृत्तपत्रे व नियतकालिके यांनी वरील उदाहरणाप्रमाणे,

अशी सरकारची योजना आहे. याबाबतीत काही अभ्यासकांचे म्हणणे असे आहे की, सरकारला छोटी वृत्तपत्रे बंदच करायची आहेत. प्रांत वा जिल्हा पातळीवर एखादेच मोठे प्रसारमाध्यम सरकारला हाताशी हवे आहे. यात तथ्य असू शकते. कारण, चीनमधील अशा प्रसारमाध्यमांची संख्या जास्तच आहे. इ.स. २००२ च्या अखेरीस चीनमध्ये २१३७ वृत्तपत्रे आणि ९०२९ नियतकालिके प्रसिद्ध होत असल्याची सरकारी नोंद आहे.

## परदेशांमधील चिनी नागरिक व प्रसारमाध्यमे

चीनमधील प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत, ही एक बाब झाली. दुसरी एक महत्त्वाची घटना म्हणजे मलेशिया, अमेरिका व इतर देशांमध्ये पसरलेल्या (तैवान वगळता) अंदाजे ३ कोटी ४० लाख चिनी नागरिकांना चीनमधील घडामोडींमध्ये विशेष रस आहे. त्यांना परदेशातही चीनमधील वृत्तपत्रे वाचण्यास आवडते. अमेरिकेत असलेल्या चिनी नागरिकांपैकी ८३ टक्के चिनी नागरिक, आपल्या घरी चिनी वा चिनी भाषेतून तयार झालेली मँडारिन भाषा बोलतात. या नागरिकांकडे फार मोठ्या प्रमाणावर संपत्ती आहे. जगातील इतर देशांच्या तुलनेत चीनने प्रसारमाध्यमांच्या दर्जाकडे, सुधारणांकडे फारसे लक्ष न दिल्याने या नागरिकांना प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रातील व्यापारात रस घेता आला नाही. कदाचित त्यामुळेही चीनमध्ये या क्षेत्रात जगप्रसिद्ध कंपनी स्थापन होऊ शकली नसावी.

मलेशियातील एक उद्योजक टियोंग हे मूळचे चीनचे. ते परदेशांमधील प्रसिद्धी माध्यमांचे चाहते. मलेशियातील चिनी लोकांच्या एका दैनिकाचे ते मालक. अगदी योगायोगाने या माध्यमाच्या क्षेत्रात आलेल्या त्यांच्या उद्योगसमूहाने गेल्या काही वर्षांत फार मोठी झेप घेऊन मलेशियाच्या वृत्तपत्रउद्योगात नाव कमावले आहे. मलेशियाच्या भेटीवर आलेल्या चीनच्या अध्यक्षांनी टियोंग यांना विशेष निमंत्रित म्हणून एका कार्यक्रमात बोलावून त्यांचा सन्मान केला आहे. परदेशांमधील असे चिनी उद्योजकही चीनला या क्षेत्रात प्रगतीपथावर नेण्यास उत्सुक असतील, असा चीनचा होरा असू शकतो. अखेरीस प्रसारमाध्यमांच्या संदर्भातील या सुधारणा म्हणजे, जागतिकीकरणाचा पुरेपूर लाभ करून घ्यायच्या चीनच्या धोरणाचीच ही एक बाजू आहे, असे म्हणता येईल.

*(संदर्भ - न्यूज फ्रॉम चीन, इकॉनॉमिस्ट, एफ.ई.ई.आर., इंटरनेट, द इकॉनॉमिस्ट)*

■■

## सामाजिक

# नवशतकातील निरक्षर भारत !

'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणा'चा (National Sample Survey) एक नवा अहवाल सप्टेंबर २००३ ला प्रसिद्ध झाला आहे. हा अहवाल आहे तो, संस्थेने, २००१-२००२ मध्ये केलेल्या कौटुंबिक उपभोग खर्च नि रोजगार-बेरोजगाराची भारतातील स्थितीच्या नमुना पाहणीचा अहवाल. या अहवालात भारतातील शिक्षित-अशिक्षित यांच्याविषयीची काही आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. (खालील तक्ता पाहावा)

शिक्षणविषयक स्थिती (आकडे टक्केवारीत)

| | ग्रामीण भारत | | | शहरी भारत | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | महिला | व्यक्ती | पुरुष | महिला | व्यक्ती |
| (१) निरक्षर | २८.४ | ५१.० | ३९.५ | १३.२ | २६.३ | १९.४ |
| (२) साक्षर | १९.६ | १५.१ | १७.४ | १३.२ | १२.८ | १३.० |
| जेमतेम तिसरी-चौथीपर्यंत पोचून 'शिकलेले निरक्षर' | ४८.० | ६६.१ | ५६.९ | २६.४ | ३९.१ | ३२.४ |

(तक्ता राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणामधील आकडेवारीवरून तयार केला आहे.)

ग्रामीण भारतात (३९.५) तसेच शहरी भारतातही (१९.४) निरक्षरांची संख्या अजूनही मोठी आहे आणि तुलनेने ती ग्रामीण भागात कितीतरी मोठी आहे हे लक्षात येते. पण एवढेच नाही. पुरुष आणि महिला अशी तुलना केली असता, चित्र किती विदारक आहे हे लक्षात येते. शहरी भागांत निरक्षर पुरुषांच्या संख्येच्या (१३.२) दुप्पट महिला (२६.३) निरक्षर आहेत, ग्रामीण भागामध्ये तर एकूण निरक्षरांची संख्या तर मोठी आहेच (३९.५), पण त्यातही पुरुषांपेक्षा (२८.४) महिलांची संख्या (५१.०) कितीतरी अधिक आहे. ग्रामीण भारतातील ५१ टक्के महिला निरक्षर असणे ही मोठी गंभीर बाब आहे.

या नमुना पाहणीतील आकडेवारीकडे अधिक बारकाईने पाहण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, इथे दिलेल्या तक्त्यांतून आणखी एक गोष्ट वाचकांच्या लक्षात येईल. केवळ साक्षरता - निरक्षरता अशा स्थूल विभागणीने शिक्षणविषयक परिस्थितीचे पुरेसे गांभीर्य लक्षात येणार नाही. ज्यांना आपण 'साक्षर' म्हणू अशा गटात, शहरी भारतात, १३.० टक्के लोक तर ग्रामीण भारतात १७.४ टक्के लोक आहेत. म्हणजे ही टक्केवारी रूढ अर्थाने 'साक्षर' गटात मोडते. (परंतु, ती शाळेत जाऊन शिकलेल्या आणि प्रत्यक्षात मात्र निरक्षरांच्या गटाजवळ जाणारी आहे.)

सामान्य अनुभव असा आहे की, जेव्हा शाळेत जाऊनही पहिल्या दोन-तीन वर्षात गळती होते, तेव्हा अतिशय अल्प शिक्षण घेतलेल्यांची साक्षरता कित्येकदा उणावण्याचीच शक्यता असते. याचा अर्थ असा की, यांनाही जवळपास निरक्षरांच्या यादीत गणावे लागते. असे जेमतेम तिसरी-चौथीपर्यंत पोचून 'शिकलेले निरक्षर' किती आहेत ?

वरील तक्त्यावरून लक्षात येईल की, शहरी भारतात अशा 'निरक्षरां'ची संख्या ३२.४ टक्क्यांवर तर ग्रामीण भारतात ती ५६.९ टक्क्यांवर पोचते. पुन्हा येथे पुरुष - महिला असा भेद आहेच. शहरी भागातील चौथीपर्यंत न पोचलेले पुरुष आहेत २६.४ टक्के तर महिला आहेत ३९.१ टक्के. ग्रामीण भारताचे चित्र अधिकच भयानक आहे. येथे चौथीपर्यंतही जाऊन न शिकलेले पुरुष आहेत ४८ टक्के. तर अशा महिला आहेत, एकूण महिलांपैकी ६६.१ टक्के.

या ६६ टक्के ग्रामीण महिलांसाठी, निरक्षर महिलांसाठी, कोणत्या रोजगाराच्या संधी असतील ? त्यांना तंत्र -विज्ञान किंवा माहिती -तंत्रज्ञान युगाचे कोणते लाभ मिळत असतील ? आपण, आपली मुले, आपले कुटुंब यांचे शिक्षण -आरोग्य यांच्यासहित सारे सांस्कृतिक जीवन उजळण्याची संधी कितपत मिळते ? मिळालीच तर घेता येते ?

असे प्रश्न सुशिक्षितांना, त्यातही शहरी सुशिक्षितांना जोवर पडत नाहीत तोवर, या ६६ टक्के ग्रामीण महिलांना न्याय्यता नि समता, लोकशाही आणि समाजवाद, जागतिकीकरण आणि उदारीकरण या एकविसाव्या शतकाच्या संपन्न अंगणात कसे उतरता येईल ?

विनोद

# विनोदोपचार !

पॉल मॅक्घी या बाई गेली कित्येक वर्षे 'मुले आणि विनोद' या विषयावर शास्त्रीय अभ्यास करीत आहेत. त्यांनी १९८९ साली एक ग्रंथ संपादित केला आहे. 'ह्युमर अँड चाईल्ड डिव्हलपमेंट : अ गाईड टू प्रॅक्टिकल ॲप्लिकेशन्स,' या ग्रंथात मुलांच्या संदर्भात, विनोदाचा, अनेक अंगांनी विचार मांडला आहे. उदाहरणार्थ, विनोदाचा वयोमानानुसार विचार किंवा बौद्धिकता, कल्पकता यांचा विकास आणि विनोद यांचा परस्पर संबंध इ. डॉक्टर्स विनोदाचा वापर करून मुलांना उपचार कसे सुसह्य करतात याही बाबतीत काही माहिती या ग्रंथात आहे.

डॉक्टरांकडे अनेक रोगी आपापल्या व्यथा घेऊन जातात; ते जातात ते काही आनंदाने नि हसत हसत जात नसतात. डॉक्टरांकडे आपणहून जाणारा निरोगी माणूस क्वचितच आढळेल. सर्वच जण आजारी, दुखऱ्या अंगाने नि उदास मनाने डॉक्टरांकडे जात असतात. जावेच लागते म्हणून जातात; नाईलाज म्हणून जातात. मुलांना तर डॉक्टरांची भीतीच वाटत असते. (प्रौढच त्यांना अशी भीती घालत असतात !) त्यांना, आपले आजारपण आणि डॉक्टरांकडे जाऊन उपचार करणे यांचा परस्परसंबंधही नकोसा वाटत असतो. त्यांना डॉक्टरांकडे जायचेच नसते. प्रौढ त्यांना बळजबरीने नेतात आणि मुलेही डॉक्टरांकडे गेल्यावर भेदरलेलीच असतात. त्यातही पुन्हा दातांच्या डॉक्टरकडे जाणे म्हणजे दैवदुर्विलासच. इतर डॉक्टरांकडे निदान तोंडाने रडता तरी येते, मुसमुसता तरी येते. पण, दाताचे डॉक्टर तीही मुभा ठेवीत नाहीत. ते तोंड धरूनच बसतात. तोंड उघडायला लावतात आणि आत डोकावून काही खुडबूड करीत राहतात. मुलांना (आणि प्रौढांनाही !) हे सारे कल्पनेतही नकोसे वाटते. मग प्रत्यक्षात जाण्याची वेळ आली तर ?

आता दंतवैद्यांनाही, लहान मुलांची ही नाखुषी, ती भीती, ते भेदरलेपण आणि त्या शारीरिक नि मानसिक वेदना यांची कल्पना असते. चांगले डॉक्टर्स तर आपणहून मुलांशी मैत्री करतात आणि फारच दुखणार असेल तर आधीच औषध लावून दुखणारा भाग बधीर करतात. बधीरतेचा नेमका शास्त्रीय अर्थ काय आहे ? त्यामागची कल्पना अशी आहे की, एखादी मानसिक अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता असेल तर, तिला रोखणारी अशी काही उपाययोजना करायची की ज्यामुळे वेदना न होता उपचाराला

तोंड देता येईल; आणि मग त्या उपचारांची भीतीही वाटेनाशी होईल. त्यामुळे त्याचे ताठरलेले स्नायू सैल होऊन अर्थातच रोग्याला हायसे वाटते..

या बधीरतेच्या तंत्राबाबत अनेक प्रकारचे संशोधन होत असते. रोग्याची तात्कालिक तीव्र भावना किंवा अस्वस्थता कमी कशी करता येईल, याबाबत उपाय शोधण्याचे प्रयत्न चालूच असतात. या संदर्भात अनेक अभ्यासही होत असतात. आता या अभ्यासांतून असे आढळून आले आहे की, हास्यविनोद ही अशीच एक स्नायू सैल करणारी आणि म्हणून वेदनाशामक अशी गोष्ट आहे. नेवो आणि शापिरा या अभ्यासकांच्या मते, अतिशयोक्ती, मूर्खपणा किंवा कोट्या यांसारख्या विसंगतीचा उपयोग, अस्वस्थता निर्माण करणाऱ्या प्रेरकांचे रूपांतर हास्य निर्माण करणाऱ्या प्रेरकांमध्ये करता येतो. यामुळे, हे अभ्यासक, लहान मुलांच्या डॉक्टरांना व दंतवैद्यांना असा सल्ला देतात की त्यांनी, विशेषतः लहान मुलांच्या बाबतीत, विनोदाच्या हत्याराचा उपयोग करावा.

डॉक्टरांच्या व दंतवैद्याच्या दवाखान्यात जर, खेळणी आणि कार्टून्स, विनोदी पुस्तके, व्यंगचित्रे 'वेटिंग रूम'मध्ये ठेवली आणि प्रत्यक्ष उपचार वा दंतयज्ञ सुरू करण्यापूर्वी हास्यविनोद, गंमतीजंमती यांचा वातावरणात शिडकावा करीत राहिले तर, मुलांना इथले वातावरण छान आहे असे वाटते, त्यांच्या मनातील भीती कमी होते आणि खेळकर वातावरणाशी मुले संलग्न होतात; नेवो व शापिरा या अभ्यासकांना असे वाटते.

आजवर दंतवैद्य, मुलांची भीती कमी करण्यासाठी 'सांगणे, दाखवणे आणि करणे,' अशाप्रकारची पद्धत वापरत आले आहेत. आधी मुलाला, अखेरीस काय नेमके केले जाणार आहे, होणार आहे, याची कल्पना द्यायची, मग उपचारांसाठी वापरले जाणारे सारे साहित्य दाखवायचे आणि मगच प्रत्यक्ष उपचार करायचा, अशी ही पद्धत आहे. यातून मुलाची अस्वस्थता कमी होण्यास मदत होते; असा अनुभव आहे. कारण, ही पद्धत पायरी-पायरीने वापरतानाही डॉक्टर विनोदाचा, विनोदामुळे निर्माण होणाऱ्या प्रसन्न वातावरणाचा, उपयोग करून घेत असतात. उदाहरणार्थ, मुलाला तोंड उघडायला सांगताना डॉक्टर म्हणतात, 'बघू, अजूनही तुझे दात टिकून आहेत का ?' किंवा 'आपल्याला या मोठ्या दिव्याचा वापर करायला हवा. कारण, तुझ्या तोंडाला खिडक्या नाहीत नं !' काही डॉक्टर्स ३ ते ६ वयोगटातल्या मुलांसाठी छानशा बडबडगीतांचाही उपयोग करतात; मुलाला खुर्चीत बसवून विमानात बसल्याची कल्पना करायला आणि तिचा आनंद घ्यायला देतात. *(पान क्रमांक ३४ वर पाहावे)*



# शांततेच्या पाऊलखुणा

## 'औद्योगिक संस्थां'चे प्रयत्न

युद्धे झाली तरच जग अशांत असते असे नाही, तर व्यापारातील फायदे -तोटे, त्यातील स्पर्धा - ताणतणाव यांमधूनही जगात अशांतता असते. जागतिकीकरणामुळे आणि खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वाचा स्वीकार केल्याने, गेल्या काही वर्षांत, ही अशांतता अधिकच वाढलेली आहे. व्यापारातून अशी अशांतता वाढू नये, पण खुल्या आर्थिक धोरणांचा लाभ सर्वच देशांना मिळावा, अशी भूमिका घेऊन सामाजिक बांधिलकी मानणारे काही उद्योजक एकत्र आले आणि त्यातून 'कॉक्स गोलमेज परिषद' अस्तित्वात आली. १९८६ मध्ये 'फिलिप्स इलेक्ट्रॉनिक्स' या उद्योगसमुहाचे अध्यक्ष फ्रेडरिक फिलिप्स आणि 'इनसेड' (INSEAD) या उद्योगाचे उपाध्यक्ष ऑलिव्हर गिसकार्ड डी-एसटेंग यांनी एकत्र येऊन व्यापारातील शांततेसाठीचे प्रयत्न सुरू केले. युरोपमधील काही देश, जपान आणि अमेरिका येथील उद्योजक या परिषदेसाठी एकत्र आले होते. जागतिक शांततेला व स्थैर्याला मारक ठरणारे व्यापारातील मुद्दे शांततेच्या मार्गाने कसे सोडविता येतील आणि जागतिक शांततेसाठी उद्योगांना कोणती जबाबदारी स्वीकारता येईल, अशा काही मुद्यांवर यावेळी चर्चा झाली. सर्वंकष चर्चेनंतर परिषदेने आपली भूमिका व सूचना कागदोपत्री मांडल्या.

'कॉक्स गोलमेज परिषदे'ची भूमिका अशी आहे की, देशादेशांमधील व्यापार हा महत्त्वाचा आहे. कारण, ती निव्वळ आर्थिक घटना नसते; तर, व्यापार व व्यापारी वागणूक ही आंतरराष्ट्रीय पातळीवर चांगले वा वाईट संबंध घडवून आणू शकते. यातून परस्परमैत्री वा शत्रुत्व निर्माण होऊ शकते. आंतरराष्ट्रीय संबंधांमधील हा एक दुवा आहे. त्यामुळे देशादेशांमधील आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यात व पर्यायाने शांतता राखण्यात औद्योगिक संस्था महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. हे लक्षात घेऊन औद्योगिक संस्थांच्या औद्योगिक वागणूकीचे मूल्यमापन व्हावे आणि ते करताना, त्या संस्थेची व्यापाराच्या दृष्टीने कंपनीच्या अंतर्गत व कंपनीच्या बाहेर समाजातील वर्तणूक ही देखील महत्त्वाची मानली पाहिजे. वागणुकीचे असे सर्वसामान्य नियम हे सर्व उद्योगांसाठी समान तसेच नैतिकता, सचोटी अशा

मूल्यांना केंद्रस्थानी ठेवून तयार करण्यात यावेत व त्याचा आदर सर्वांनी केला पाहिजे. परिषदेची भूमिका ही आदर्शाकडे झुकणारी व सकारात्मक विचारांना जवळ करणारी आहे. कारण, चांगले आदर्श ठेवले तरच काही चांगले घडण्याची शक्यता आहे, असे परिषद जाणून आहे.

ही भूमिका 'क्योसेई' व 'मानवी प्रतिष्ठा' या दोन संकल्पनांवर आधारित आहे. 'क्योसेई' ही जपानमधील एक संकल्पना आहे. त्यानुसार, एका चांगल्या उद्दिष्टासाठी समाजातील विविध घटकांनी आदर्श सहजीवन जगणे अपेक्षित आहे. त्यासाठी परस्पर सहकार्य व परस्पर विकास होणे हेही गरजेचे आहे. त्यामुळे निष्पक्ष, निकोप व न्याय्य स्पर्धा ही सर्वांनी मान्य करावी, असेही अपेक्षित आहे. मानवी प्रतिष्ठा ही दुसरी संकल्पना देखील सर्वांसाठी महत्त्वाची आहे. परिषदेच्या मते ती एक पवित्र बाब मानली पाहिजे. केवळ इतर काही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठीच त्याचे महत्त्व आहे, असे नसावे. या गोलमेज परिषदेने या दोन संकल्पनांवर आधारित अशी काही सर्वसामान्य तत्त्वे व्यापारासाठी मांडली आहेत.

(१) औद्योगिक संस्थांची जबाबदारी - औद्योगिक संस्थांची जबाबदारी ही फक्त भागधारक (शेअरहोल्डर्स) वा संचालकमंडळाप्रती मर्यादित नाही. ती अधिक व्यापक आहे. औद्योगिक संस्थांचे समाजात महत्त्व आहे, मूल्य आहे. औद्योगिक संस्था या संपत्ती व रोजगार निर्माण करतात आणि ग्राहकांपर्यंत विविध उत्पादने वा सेवा पोचवितात. ही उत्पादने वा सेवा चांगल्या दर्जाची आणि वाजवी किंमतीत उपलब्ध करून देण्याने या औद्योगिक संस्थांचे समाजातील महत्त्व वा मूल्य वाढते. याशिवाय, आपल्या कर्मचाऱ्यांचे, ग्राहकांचे व आपल्या संबंधात येणाऱ्या इतर घटकांच्या सामाजिक स्थितीत चांगला बदल घडवून आणणे, हे देखील औद्योगिक संस्थांचे एक महत्त्वाचे कार्य ठरते.

(२) व्यापाराचा आर्थिक व सामाजिक परिणाम - जागतिकीकरणाच्या या काळात अनेक कंपन्या आपली उत्पादने वा सेवा दुसऱ्या देशांमध्ये विकतात वा कधी आपली उत्पादने दुसऱ्या देशांमधून तयार करवून घेत असतात. तेव्हा ज्या देशांशी औद्योगिक संस्थांचा संबंध येतो, त्या देशांमधील नागरिकांची खरेदीशक्ती वाढण्याच्या हेतूने, त्या नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देणे हे एक महत्त्वाचे कार्य या कंपन्यांनी केले पाहिजे. ज्या देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले तिथेही आणि एकूण जागतिक स्तरावर देखील औद्योगिक संस्थांनी शिक्षण, मानवाधिकार, समाजकल्याण अशा सर्व

बाबींमध्ये मदत करायला हवी. विविध देशांमधील निसर्गाचे, पर्यावरणाचे व समाजाचे नुकसान न करता या सर्वांचा सुयोग्य वापर व त्याच्या जोडीला नवीन तंत्रज्ञान याचा वापर या कंपन्यांनी करायला हवा.

(३) व्यापारी वागणूक -संस्थांनी कायद्याच्या भाषेव्यतिरिक्त परस्परविश्वासाची भाषा अंमलात आणली पाहिजे. प्रत्येकाची काही व्यापारी गुपिते असतात, हे सर्वमान्य आहे; तरीदेखील व्यापारी संस्थांमध्ये प्रामाणिकपणा, मोकळेपणा, शब्दपालन या मूल्यांना महत्त्व मिळाले पाहिजे. यामुळे कंपन्यांचे स्थैर्य व विश्वासार्हता वाढेलच, शिवाय व्यापारात सुलभता येईल. विशेषतः आंतरराष्ट्रीय पातळीवर हे होणे फायद्याचेच ठरेल.

(४) नियमांप्रती आदर - व्यापारातील ताणतणाव व संघर्ष निवळून खुला व मुक्त व्यापार होण्यासाठी औद्योगिक संस्थांनी, आंतरराष्ट्रीय पातळीवरील तसेच देशांतर्गत नियम पाळले पाहिजेत. काही नियम हे त्या कंपनीसाठी फारसे उपयोगी नसतीलही, पण तरी ते नियम पाळले गेले पाहिजेत.

(५) बहुराष्ट्रीय व्यापाराला पाठिंबा - जागतिक व्यापार संघटनेतंर्गत होणाऱ्या विविध देशांमधील व्यापाराला औद्योगिक संघटनांनी पाठिंबा दिला पाहिजे. आंतरराष्ट्रीय पातळीवर न्याय्य व्यापाराला पाठिंबा देताना विविध देशांच्या अंतर्गत धोरणांप्रती आदर दर्शविला पाहिजे.

(६) पर्यावरण जपणे - कोणत्याही देशात व्यापार - उद्योग करताना तेथील पर्यावरणाचे नैसर्गिक साधनस्रोतांचे रक्षण करणे ही औद्योगिक संस्थांची जबाबदारी आहे. सातत्यपूर्ण विकास व पर्यावरणात सुधारणा घडवून आणणे याकामी उद्योगांनी स्थानिकांना मदत केली पाहिजे.

(७) बेकायदेशीर, अनैतिक व भ्रष्ट व्यापार टाळणे - लाचलुचपत, भ्रष्ट व्यापार, पैशाची अफरातफर यांना औद्योगिक संस्थांनी थारा देता कामा नये, उलट हे प्रकार असतील तर ते बंद करण्याच्या कामी या संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे. शस्त्रांचा व मादक द्रव्यांचा व्यापार यांपासून दूर राहण्याचा प्रयत्न व्यापारी संस्थांनी करायला हवा.

उद्योगांमधील सामाजिक जाणीव जागती ठेवून सामाजिक ताणतणाव टाळण्याचे हे प्रयत्न हळूहळू यशस्वी होत आहेत. भारतासह अनेक देशांमधील औद्योगिक संस्था विविध समाजोपयोगी कार्यात सहभागी होत आहेत. तसेच कर्मचाऱ्यांची नैतिकता वाढविण्याचेही प्रयत्न करण्यात येत आहेत. *(संदर्भ - इंटरनेट)* ■■

## मोहम्मद पैगंबरांची पत्नी आणि आधुनिक मुस्लिम महिला

इस्लाम आणि मुस्लिम स्त्रियांचे स्वातंत्र्य हा विषय आता सौदी अरेबियात महत्त्वाचा ठरू लागला आहे. येथील विद्यापीठांमधील अनेक सुशिक्षित स्त्रिया पुरुषांनी स्त्रियांचे स्वातंत्र्य ठरवू नये, असे म्हणू लागल्या आहेत आणि आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ त्यांनी मोहम्मद पैगंबरांची पत्नी आयेशा (Aisha) यांचे उदाहरण दिले आहे. पैगंबरांच्या मृत्यूनंतर इस्लामच्या प्रसाराचे काम आयेशा यांनी केले आणि वेळप्रसंगी युद्धांमध्ये पुरुषवर्गाचे नेतृत्व देखील केले आहे, असे या महिला म्हणतात.

पैगंबरांच्या काळात स्त्रीला भरपूर स्वातंत्र्य होते; तसेच कौटुंबिक मालमत्तेत तिचा वाटा किंवा तत्सम सुधारणा करण्यात पैगंबरांनी पुढाकार घेतला होता, असेही इतिहासातून समजून येते, असे या महिला म्हणतात. मुस्लिम देशांमध्ये व इस्लाममध्ये निर्माण झालेल्या परंपरा ही बाब वेगळी आणि इस्लामच्या धर्मग्रंथात म्हटले आहे ते वेगळे, असे म्हणून त्याचा नव्याने अर्थ लावला जाणे हे कालसुसंगत ठरेल, असे अबुखालिद या महिलेचे म्हणणे आहे. पाश्चात्य विचारांच्या आहारी न जाता धर्मग्रंथांच्या आधारेच मुस्लिम महिलांना दैनंदिन जीवनातील स्वातंत्र्य मिळविता येणे शक्य आहे, असे या गटाला वाटते. अर्थात, इस्लाम धर्म मानणारे अनेक पुरुष या वैचारिक लढ्याला विरोध करतीलच, याची त्यांना कल्पना आहे. तथापि हा वैचारिक संघर्ष दीर्घकाळ चालणार आहे आणि आज नाही, पण काही वर्षांनी स्त्रियांना धर्मांतर्गतच स्वातंत्र्य मिळेल असा, या स्त्री गटाचा विश्वास आहे.

*(संदर्भ - द न्यूयॉर्क टाइम्स,)* ■■

## जपानमध्ये ख्रिश्चन धर्म संपणार ?

जपानने अनेक बाबतीत पाश्चात्यांचे अनुकरण केले असले तरी पश्चिमेकडील ख्रिश्चन धर्म मात्र येथे रुजला नाही. पंधराव्या शतकाच्या अखेरीच्या कालखंडात येथे थोडा काळ धार्मिक स्वातंत्र्य होते; तेव्हा पोर्तुगीज मिशनऱ्यांकडून येथे ख्रिश्चन धर्म थोडासा पसरला. नागासाकी जवळच्या इकित्सुकी बेटावर अल्प प्रमाणात टिकून राहिलेला ख्रिश्चन धर्म पुढे चालविण्यास अलीकडे नवयुवकच मिळत नाहीत, अशी वृद्ध ख्रिश्चनधर्मीयांची खंत आहे. *(संदर्भ - द न्यूयॉर्क टाइम्स )* ■■

*(पान क्रमांक २९ वरून)*

नेवो व शापिरा या अभ्यासकांचे अवलोकन असे आहे की, विनोदामुळे दंतवैद्य आणि रोगी यांच्यामध्ये खेळीमेळीचे वातावरण तयार होते, एक स्नेहाळ असा नातेसंबंध तयार होतो. त्यांनी वेगवेगळ्या दंतवैद्यांशी केलेल्या संवादातून विनोदाची कितीतरी 'कार्ये' दिसून आली. लक्ष दुसरीकडे वेधणे, बालकाची (किंवा त्याच्या पालकाची) भीती, अस्वस्थता कमी करणे, माहिती अधिक रंजकतेने पुरवणे आणि बालकाचा (नि खुद्द डॉक्टरचाही) सहभाग उत्पन्न करणे असे नानाविध उपयोग, हास्यविनोदाचा वापर करण्याचे आहेत. निरोगी माणसाच्या काय किंवा रोग्याच्या काय, जीवनात विनोदाचे स्थान मोठेच आहे ! *(संदर्भ - टेरी स्मिथ यांचे पुस्तक परीक्षण)*

---

*एक डॉक्टर रोग्याला सांगत होते... एकदा काय झालं, अगदी चिक्कूमारवाडी म्हातारे जोडपे कधी नव्हे ते, खानावळीत जेवायला गेले. म्हाताऱ्याने एकच ताट मागवले, तो व्यवस्थित जेवला; आपले जेवण झाल्यावर मग त्याने बायकोसाठी दुसरे ताट मागविले व ती आता जेवू लागली. नवऱ्याच्या नंतर बायको जेवायला बसली; त्यामुळे वेटरला ही पारंपरिक रीत पाळल्याबद्दल त्या म्हाताऱ्या जोडप्याचे आश्चर्य वाटले, त्याने तसे बोलून दाखवताच म्हातारी खवळली. ती म्हणाली, "असं काही नाही. आमच्या दोघांच्यात दाताची कवळी एकच आहे !"*


## <u>निवेदन</u>

**'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'**

<u>भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या इंग्रजी त्रैमासिकाची</u>

**१९५२ ते २००३ या कालखंडातील निवडणुकांच्या राज्यनिहाय, पक्षनिहाय, विभाग/जिल्हानिहाय, वर्गनिहाय आकडेवारीची ३३७ पानी पुरवणी ग्रंथरुपात उपलब्ध**

<u>अभ्यासकांना, राजकीय पक्षांना व वृत्तपत्रांनाही उपयुक्त.</u>


(सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज, नवी दिल्ली, द्वारा संकलित)

किंमत ३५०/- रुपये (पोस्टेजसह) मागणीसाठी मनीऑर्डर, डी.डी. पाठवून संपर्क साधावा (व्ही.पी.पी.मान्य)

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे -४११०१६ e-mail - ispe@vsnl.com**

# कालप्रवाहात.... मागणी जास्त, पुरवठा कमीच !

भारतात विजेची मागणी वाढत आहे. विजेची मागणी व पुरवठा यांतील तूट ही ९.१ % आहे. ही तूट भरून काढण्यासाठी इ.स. २०१२ पर्यंत, १०० गिगॅवॅटस्‌ची अतिरिक्त निर्मितीक्षमता भारताकडे असणे गरजेचे आहे. विजेच्या पुरवठ्याबाबत अलीकडेच करण्यात आलेल्या १६ व्या सर्वेक्षणातून हे स्पष्ट झाले. १९९७-१९९८ पासून विजेच्या तूटीची टक्केवारी खालील आलेखातून स्पष्ट होईल.




*एप्रिल ०२ -जानेवारी ०३

*(संदर्भ - केंद्र सरकारचे वीज मंत्रालय, इकॉनॉमिक टाइम्स)*

विसाव्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत संपूर्ण जगाने अंधाराचे साम्राज्य अनुभवले होते. विजेचा शोध लागल्यानंतर जग प्रकाशमान झाले. मात्र, आज २००३ साली देखील, भारतातील ४४ टक्के नागरिकांना अंधाराचे साम्राज्य अनुभवावे लागत आहे; आणि संपूर्ण जगात, ग्रामीण भागांतील ५५ टक्के नागरिकांचे जग प्रकाशमान झालेले नाही. आजही आफ्रिकेत अंधाराचे साम्राज्य आहे. तेथील ९६ टक्के मालावी लोकसंख्या अंधारात राहात आहे. टांझानिया येथील ९२ टक्के व झिम्बाब्वे येथील ८८ टक्के लोकसंख्या अंधारातच आहे.

(संदर्भ - डाऊन टू अर्थ, ऑक्टोबर २००३)

अर्थकारणाच्या प्रत्येक चळवळीत सक्रीय सहभागी

स्तंभयोरुभयोंमध्ये दिपमाला विराजते
महाराष्ट्रधिकोषस्य मुद्रेयं लोकमङ्गला

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)

: केंद्रीय कार्यालय :
'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर,
पुणे - 411 005.
Web : www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.

---

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

# गुरुवर्य धोंडो केशव कर्वे यांचे चिंतन

*जीवित हे पूर्ण पाहिजे. अपूर्ण उपयोगाचे नाही. पूर्णाचा साधेपणा अपूर्णाला कळावयाचा नाही. परंतु पूर्णाला अपूर्णाची कल्पना होऊ शकेल. पापाला पवित्रपणाची कल्पना येणार नाही, पण पवित्रपणाला पापाची कल्पना होईल. ज्याला मोठे व्हावयाचे असेल त्याला लहान झाले पाहिजे. कोणत्याही आकृतीत वर्तुळाचा समावेश होत नाही. पण वर्तुळात सर्व आकृती साठविलेल्या आहेत. कोणत्याही रंगात शुभ्र प्रकाश साठविलेला नाही. पण शुभ्र प्रकाशात सर्व रंग साठवलेले आहेत. मनुष्याला 'मी' विसरू दे म्हणजे त्याला पूर्णत्वाचे वर्तुळ कळेल. त्याला आपल्या अंत:करणातील विचारांचे व वासनांचे पालटणारे रंग कळू देत म्हणजे त्याला ज्ञानाचा शुभ्र प्रकाश दिसू लागेल. स्वरसंयोगात कोणताही एक स्वर जरी कळून आला नाही तरी तो त्यात असतो खास व त्याचा उपयोगही आहे. पाण्याचा एक बिंदू सागरात गुप्त झाला तरी त्याचा उपयोग फार मोठा असतो. प्रेमाने तुझे स्वत्व मनुष्यजातीत लीन होऊन जाऊ दे म्हणजे तू स्वर्गातील एकतानता उत्पन्न करशील. दयेने सर्वांशी एकरूप हो म्हणजे तू टिकणारी कामे करशील व आनंदसागरात लीन होऊन जाशील.*

*प्रथम मनुष्याची उत्क्रांती वर्तुळाच्या मध्याकडून परिघाकडे म्हणजे साधेपणाकडून गुंतागंतीकडे होत जाते व मग पुढे परिघाकडून मध्यबिंदूकडे म्हणजे गुंतागुंतीकडून साधेपणाकडे अपक्रांती होते. स्वत:ला जाणल्याशिवाय विश्व जाणण्याचे प्रयत्न निष्फळ होतील असे जेव्हा मनुष्याला कळू लागते तेव्हा तो उलटप्रवासाला सुरूवात करतो व मूळच्या साधेपणावर येतो. तो आतून विकास पावू लागतो व अखेरीस सर्व विश्वाला आपल्या पाकळ्यांचे आवरण घालतो.*

*(भारतीय स्त्री, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था माणिक महोत्सव प्रकाशन, मलपृष्ठावरील मजकूर)*

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■ भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■ अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ■ इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■ संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■ संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■ अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●अजित कर्णिक ●विकासचंद्र चित्रे ●मृणाल दत्तचौधरी ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●के. एन्. राज ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**